दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२५२ शुक्रवार दि.२२ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-252 Friday, Dt.22 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# मान्सून तोंडावर प्रशासन अजून कागदावर..!

बीड प्रतिनिधी

राज्यातील मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेतला असता धक्कादायक वास्तव उघड; नालेसफाई अपुरी, आपत्ती यंत्रणा अर्धवट, निधीचा गोंधळ कायम आहे. महाराष्ट्रामध्ये मान्सून अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना शासन आणि स्थानिक प्रशासनाच्या तयारीचे वास्तव मात्र चिंताजनक असल्याचे चित्र समोर येत आहे.

दरवर्षी मान्सूनपूर्व आढावा बैठक घेतली जाते, आदेश काढले जातात, विभागांना सूचना दिल्या जातात. पण प्रत्यक्ष जमिनीवर परिस्थिती पाहिली असता अनेक ठिकाणी प्रशासन अजूनही फक्त कागदी तयारीत अडकलेले दिसत आहे. विशेषतः ग्रामीण भाग, महानगरपालिका क्षेत्रे, धरण परिसर, पूरप्रवण गावे आणि डोंगराळ पट्ट्यांमध्ये आवश्यक उपाययोजनांचा वेग अत्यंत संथ असल्याचे वास्तव आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांत नालेसफाईची कामे अद्याप पूर्ण झालेली नाहीत. शहरांमधील गटारे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी कागदोपत्री शेकडो टन गाळ काढल्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी पहिल्याच पावसात पाणी साचण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेषतः मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि मराठवाड्यातील शहरांमध्ये नालेसफाईवर कोट्यवधी रुपये खर्च झाल्याचे दाखवले जात असले तरी नागरिकांना प्रत्यक्ष बदल जाणवत नसल्याची तक्रार आहे.

ग्रामीण भागातील परिस्थिती आणखी गंभीर



मानली जात आहे. अनेक जिल्ह्यांत लहान पूल, रस्ते आणि ओढ्यांवरील बंधारे दुरुस्तीअभावी धोकादायक स्थितीत आहेत. काही भागांत मागील वर्षीच्या पावसामुळे खराब झालेले रस्ते अजूनही कायम आहेत. ग्रामपंचायत आणि पंचायत समित्यांना निधी मंजूर झाला असला तरी प्रत्यक्ष कामांना गती नसल्याचे चित्र आहे. परिणामी, मुसळधार पाऊस सुरू झाल्यानंतर गावांचा संपर्क तुटण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेची तयारीही अनेक ठिकाणी अपुरी असल्याचे समोर आले आहे. जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष सुरू करण्याचे आदेश असले तरी काही ठिकाणी मनुष्यबळ अपुरे आहे. बचाव पथकांची उपकरणे, बोटी, लाइफ जॅकेट्स आणि आपत्कालीन साहित्याची उपलब्धता अजूनही अपुरी असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि स्थानिक प्रशासन यांच्यातील समन्वयावरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

धरणांच्या सुरक्षिततेचा मुद्दाही गंभीर बनला आहे. काही धरणांमध्ये गाळ साचल्यामुळे साठवण क्षमता कमी झाली असून वेळेवर दुरुस्ती व तपासण्या पूर्ण झाल्या नसल्याची चर्चा आहे. सिंचन विभागाने सर्व धरणे सुरक्षित असल्याचा दावा केला असला तरी अनेक भागांतील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अतिवृष्टी झाल्यास पाण्याचे विसर्ग व्यवस्थापन कितपत प्रभावी राहील, याबाबत शंका व्यक्त होत आहेत.

आरोग्य विभागाने पावसाळी साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी तयारी सुरू केल्याचा दावा केला असला तरी ग्रामीण रुग्णालयांमध्ये औषधसाठा आणि डॉक्टरांची कमतरता अजूनही कायम आहे. डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो आणि दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असूनही अनेक ठिकाणी फॉगिंग आणि स्वच्छता मोहिमा केवळ दिखावूपुरत्याच मर्यादित असल्याचा आरोप होत आहे.

दरम्यान, हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने प्रशासनावर अधिक जबाबदारी वाढली आहे. मात्र प्रत्यक्षात विविध विभागांतील समन्वयाचा अभाव, निधी वितरणातील विलंब, कंत्राटी प्रक्रियेतील अडथळे आणि स्थानिक पातळीवरील उदासीनता यामुळे मान्सूनपूर्व तयारीचा फुगा पुन्हा एकदा फुटण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरवर्षी पाऊस आला की प्रशासन जागे होते, पूरस्थितीनंतर बैठका घेतल्या जातात, चौकशा जाहीर होतात आणि पुन्हा पुढच्या वर्षी तीच परिस्थिती निर्माण होते. यंदाही जर हीच निष्क्रियता कायम राहिली, तर मान्सूनपूर्व आढावा हा केवळ सरकारी फाईलमधील औपचारिक कार्यक्रम ठरेल आणि त्याची किंमत सामान्य नागरिकांना जीव, मालमत्ता आणि हालअपेष्टा यांच्या रूपाने मोजावी लागेल.

## बीड शहर स्वच्छता व पाणीपुरवठ्यासाठी मोदी सरकारने दिला ४८ कोटींचा निधी

### पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री पंकजाताईंचे आभार - सलीम जहाँगीर

बीड ( प्रतिनिधी) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकासाचा दृष्टिकोन व्यापक आहे. त्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पाठपुरावाचे बळ मिळत असून त्याच दृष्टिकोनातून केंद्र सरकारने बीड शहरातील स्वच्छता आणि पाणीपुरवठा योजनेसाठी तब्बल ४८ कोटी रुपयांचा निधी दिला आहे. बीड शहराच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय समोर ठेवून हा निधी जाहीर केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगीर यांनी जाहीर आभार मानले आहेत.

बीड शहरातील नागरिकांना स्वच्छता व पाणीपुरवठ्याच्या मूलभूत सुविधांमध्ये मोठा दिलासा मिळणार असून, पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार केंद्र शासनाकडून बीड नगर परिषदेला ४८,२९,०७,४८२/- (अक्षरी रुपये अठ्ठेचाळीस कोटी एकोणतीस लाख



सात हजार चारशे ब्याऐंशी फक्त) इतका निधी प्राप्त झाला आहे. विशेष म्हणजे, आर्थिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या प्रशासकीय कालावधीतील पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत मंजूर झालेला निधी संबंधित वर्षांमध्ये बीड नगर परिषदेला प्राप्त झाला नव्हता. सदर प्रलंबित निधी आता चालू वर्षात एकत्रित स्वरूपात नगर परिषदेला प्राप्त झाला असून, त्यामुळे शहरातील प्रलंबित नागरी सुविधा विकासकामांना मोठी गती मिळणार आहे. हा निधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकसंख्येच्या निकषावर केंद्र शासनामार्फत वितरित केला जातो. त्यानुसार बीड जिल्ह्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी मंजूर करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हा निधी बंधनकारक अनुदान स्वरूपात असून, त्यातील ५० टक्के निधी पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेत सुधारणा, पाणीपुरवठा सक्षमीकरण, रेनवॉटर हार्वेस्टिंग आणि पाण्याच्या पुनर्वापरासाठी, तर उर्वरित ५० टक्के निधी प्रभावी घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छता उपक्रमांसाठी वापरणे बंधनकारक आहे. हा निधी जाहीर करून केंद्र सरकारने देशासाठी सर्वांगीण विकासाचा दृष्टिकोन व्यापक असल्याचे दाखवून दिल्याचे भाजप नेते सलीम जहाँगीर यांनी म्हटले आहे.

## मोहा येथे बांधकामावरून पडून अमोल माने या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

बीड प्रतिनिधी

मोहा ता. परळी येथील बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवरून खाली पडल्याने अमोल विलास माने (वय २८, रा. गोविंद नगर, धानोरा रोड, बीड) या युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.

या दुर्दैवी घटनेची सिरसाळा पोलीस ठाण्यात बीएनएसएसच्या कलम १९४ अंतर्गत अनैसर्गिक मृत्युची नोंद करण्यात आली असुन पोलीस हवालदार विष्णु नामदेव शेंडगे अधिक तपास करत आहेत .



याबाबत मयताची आई निर्मला विलास माने यांनी सिरसाळा पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार, दि. १२ मे २०२६ रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास कंत्राटदार मुस्ताक कादरी व कामगार अक्षय गायकवाड आणि शेख अजीन हे त्यांच्या घरी आले. त्यांनी अमोल हा मोहा येथील बांधकाम साईटवर काम करत असताना दुसऱ्या मजल्यावरील टेरेसवरून खाली पडल्याचे सांगितले. त्याच्या डोक्याला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने त्याला तातडीने शासकीय रुग्णालय, अंबाजोगाई येथे उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

मात्र नंतर नातेवाईकांकडून अमोलचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे समजले. त्यानंतर सिरसाळा पोलिसांनी पंचनामा करून शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण केली. अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.त्यानंतर अंकुश नगर, बीड येथील स्मशानभूमीत अमोल माने यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.दरम्यान, या प्रकरणी सध्या तरी कोणावरही संशय अथवा तक्रार नसल्याचे निर्मला माने यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे.अकाली निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## नगर परिषद लेखापाल गणेश पगारे यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

### अन्यथा २६ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण - अक्षय कोकाटे

बीड /प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) बीड शहराच्या वतीने नगर परिषद बीड येथील सहा-लेखापाल गणेश तुळशीराम पगारे यांच्याविरोधात भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली असून, अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने २६ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) चे शहर संघटक सचिव अक्षय कोकाटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नगर परिषद बीड येथे आस्थापना, लेखा, स्वच्छता यांसह विविध विभागांचा अतिरिक्त कार्यभार संबंधित अधिकाऱ्याकडे असून, कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले आहेत. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या नियुक्त्यांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

या पार्श्वभूमीवर, संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा २६ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

## बीड बायपासवरील 'हॉटेल दुबई पॅलेस'ची फेसबुकवर बदनामी

### नेकनूर पोलिसांत गुन्हा दाखल

नेकनूर /प्रतिनिधी

बीड बायपास रोडवरील मौजे आहेर वडगाव चौकातील प्रसिद्ध 'हॉटेल दुबई पॅलेस'ची सोशल मीडियावर खोटी आणि बदनामीकारक पोस्ट टाकून प्रतिमा मलीन केल्याप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी हॉटेल चालक अरशमीद सिध्दीक शेख (वय ३९, रा. नेकनूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संतोष बजरंग शिंदे (रा. शेख वाडा, नेकनूर) याच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

काय आहे नेमके प्रकरण ?

फिर्यादी अरशमीद शेख हे बीड-मांजरसुंबा रोडवरील आहेर वडगाव चौकात 'हॉटेल दुबई पॅलेस' चालवून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. दि. १९ मे २०२६ रोजी रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास शेख हे नेकनूर येथील घरी असताना, त्यांचे मित्र काझी मोहम्मद अब्दुल गणी यांनी

पान २ वर...

### धंद्याचे नुकसान करण्याचा प्रयत्न

हॉटेल चालकाने फिर्यादीत नमूद केले आहे की, हॉटेलची बदनामी करण्याच्या आणि व्यवसायाला आर्थिक नुकसान पोहोचवण्याच्या उद्देशानेच ही खोटी व मानहानीकारक पोस्ट सोशल मीडियावर पसरवण्यात आली आहे. या खोट्या अफवेमुळे हॉटेलच्या नावावर आणि धंद्यावर मोठा विपरीत परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

याप्रकरणी अरशमीद सिध्दीक शेख यांच्या तोंडी तक्रारीवरून नेकनूर पोलीस ठाण्यात संगणक टंकलिखित एफआयआर (तक्रार) नोंदवण्यात आली असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## हिंगणी खुर्द येथील पानंद रस्ते लवकरच होणार अतिक्रमणमुक्त!

### तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे प्रत्यक्ष पाहणी करून आदेश

बीड प्रतिनिधी

तालुक्यातील हिंगणी खुर्द येथील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला पानंद रस्त्यांचा प्रश्न अखेर मार्गी लागणार आहे. गुरुवारी (दि. २१) बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, मंडळ अधिकारी जायभाय आणि तलाठी इनकर यांनी स्वतः गावात जाऊन या रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीअंती रस्त्यांवरील अतिक्रमण तात्काळ हटवून रस्ते



मोकळे करण्याचे आदेश तहसीलदार शेळके यांनी संबंधित प्रशासनाला दिले आहेत.

हिंगणी खुर्द हे गाव मांजरा नदीच्या काठावर वसलेले असल्याने येथे उसाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. शेतीमाल आणण्यासाठी आणि दळणवळणासाठी येथील शेतकऱ्यांना पानंद रस्त्यांचा वापर करावा लागतो. मात्र, अनेक ठिकाणी या रस्त्यांवर अतिक्रमणे झाल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते. ही बाब गांभीर्याने घेत तहसीलदार

पान २ वर...

## बीड नगरपालिकेच्या निजामी राजवटी विरुद्ध रान पेटल्यावर सारवासारव...

## वृध्द महिला भाजी विक्रेती विरुध्द झालेली कारवाई चुकीची, भविष्यात अशी चूक खपवून घेणार नाही - आ. विजयसिंह पंडित

बीड /प्रतिनिधी

शहरातील भाजी मंडई समोर अतिक्रमण विरोधी पथकाने केलेल्या कारवाईचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल झाला आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी या प्रकरणाची दखल घेऊन मुख्याधिकाऱ्यांसह संबंधितांना या प्रकरणी जाब विचारला, मुळात पालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांसह जबाबदार अधिकाऱ्यांनी या कारवाई संदर्भात कोणतेही आदेश दिले नसल्याची बाब उघडकीस आली आहे. झालेल्या प्रकाराची आ. पंडित यांनी गंभीर दखल घेऊन भविष्यात गोर-गरीब भाजी विक्रेत्यांविरुध्द अन्यायकारक कारवाई खपवून घेतली जाणार नाही असा इशारा त्यांनी दिला. नियमानुसार अतिक्रमण निघाले पाहिजे, अतिक्रमण विरोधी कारवाई करताना दुजाभाव करू नका हातावर पोट असलेल्या लोकांना सावरण्याची संधी द्या अशा सूचनाही त्यांनी संबंधितांना दिल्या आहेत.



बीड शहरातील भाजी मंडई समोर बुधवार, दि.२० मे रोजी अतिक्रमण विरोधी पथकाने केलेल्या कारवाईमध्ये एका वयोवृध्द महिला भाजी विक्रेतीचा भाजीपाला फेकून दिल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. या बाबत अनेक उलट-सुलट प्रतिक्रिया येत आहेत. आ. विजयसिंह पंडित यांनी मुंबई मध्ये मंत्रालयीन कामात व्यस्त असतानाही या गंभीर प्रकरणाची दखल घेतली. नगर परिषदेचे मुख्याधिकारी, नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, गटनेते फारुक पटेल यांच्यासह

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय....

## इंधनाचे हाल जबाबदार कोण ?

देशात पेट्रोल-डिझेलचे दर पुन्हा सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर जात असताना सरकार, तेल कंपन्या आणि राजकीय पक्ष एकमेकांवर जबाबदारी ढकलण्यात व्यस्त आहेत. मात्र प्रश्न असा आहे की, या इंधन दरवाढीच्या ज्वाळेत होरपळणाऱ्या जनतेला दिलासा देणार कोण ? आज परिस्थिती अशी झाली आहे की, वाहन चालवणे ही गरज नसून चैनीची बाब वाटू लागली आहे. शेतकरी, कामगार, व्यापारी, नोकरदार, विद्यार्थी प्रत्येकाच्या खिशाला इंधन दरवाढीचा चटका बसत आहे.

देशात कच्च्या तेलाचे आंतरराष्ट्रीय दर कधी कमी होतात, तर कधी वाढतात. पण भारतात मात्र पेट्रोल-डिझेलचे दर फारसे खाली येताना दिसत नाहीत. कारण दरवाढीमागे केवळ आंतरराष्ट्रीय बाजार कारणीभूत नसतो; केंद्र व राज्य सरकारांनी लावलेले प्रचंड कर हेच खरे जनतेच्या खिशावरचे ओझे ठरत आहे. एका लिटर पेट्रोलमागे सरकार विविध करांच्या माध्यमातून मोठा महसूल गोळा करते. जनतेला विकासाच्या नावाखाली करांचा बोजा सहन करावा लागत आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, इंधन दरवाढीचा परिणाम केवळ वाहनांपुरता मर्यादित राहत नाही. मालवाहतूक महाग होते, बाजारातील वस्तूंचे दर वाढतात, शेतीचा खर्च वाढतो आणि महागाई संपूर्ण अर्थव्यवस्थेला पोखरू लागते. म्हणजेच पेट्रोल-डिझेलचे वाढलेले दर हे सामान्य माणसाच्या रोजच्या जेवणाच्या ताटापर्यंत पोहोचतात. सरकार मात्र आकडेवारीचा खेळ मांडत आर्थिक स्थैर्य असल्याचे चित्र रंगवत राहते.

राजकीय पक्षांचेही दुटप्पी धोरण जनतेने ओळखले आहे. सत्तेत असताना दरवाढ आंतरराष्ट्रीय परिस्थिती म्हणून समर्थनीय ठरते; तर विरोधात असताना त्याच दरवाढीविरोधात आंदोलने केली जातात. जनता मात्र कायम भरडली जाते. इंधन हा केवळ महसूल कमावण्याचा स्रोत नसून देशाच्या आर्थिक रक्तवाहिन्यांचा भाग आहे, हे सरकारांनी समजून घेतले पाहिजे.

दैनिक समर्थ राजयोग शुक्रवार दिनांक २२ मे २०२६

PUBLIC NOTICE OF NAME CHANGE

I HEREBY DECLARE THROUGH THIS PUBLICATION THAT MY NAME HAS BEEN CHANGED
OLD NAME: SHAIKH HEENAKAUSAR SATTAR
NEW NAME: HEENA KAUSAR MOHAMMAD ASLAM SHAIKH
ADDRESS: BAJIMARKET NEAR S D M OFFICE JAWAHAR ARB MOHALLA AMBAD JALNA
PIN CODE: 431204
MOBILE NO.:- 80877 77674
THIS DECLARATION IS MADE FOR ALL LEGAL PURPOSES.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे पॉलीटेक्निक प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ साठी सुविधा केंद्र सुरु

बीड /प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पोस्ट एसएससी डिप्लोमा (पॉलीटेक्निक) प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेस प्रारंभ झाला असून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरावा लागणार आहे.

प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, तांत्रिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होतात. पॉलीटेक्निक शिक्षण हे उद्योग क्षेत्राशी निगडित कौशल्य विकसित करणारे शिक्षण असून विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी योग्य शाखेची निवड करावी. यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, अनुभवी प्राध्यापकवर्ग, सुसज्ज प्रयोगशाळा व आधुनिक सुविधा उपलब्ध आहेत.

प्रवेश प्रक्रियेनुसार ऑनलाईन नोंदणी, अर्ज भरणे व आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची मुदत २० मे २०२६ ते २२ जून २०२६ पर्यंत राहणार आहे. याच कालावधीत अर्ज पडताळणी व निश्चिती प्रक्रिया देखील होणार आहे. तात्पुरती गुणवत्ता यादी २४ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात येणार असून गुणवत्ता यादीवरील हरकती व तक्रारी २५ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत नोंदविता येणार आहेत. अंतिम गुणवत्ता यादी ०२ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड यांचा सुविधा क्रमांक- २१८२ असा



असून प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रिया समन्वयक श्री. उबाळे एल.एच. (मो. ८८८८०८१३८५) तसेच श्री. वरोडे ए.ए. (मो. ९४२१३३५११५) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.


## डॉ. संजय तांदळे यांना पितृशोक

## चंद्रसेन रंगनाथ तांदळे यांचे दु:खद निधन

बीड /प्रतिनिधी

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांचे वडील भूविकास बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी चंद्रसेन रंगनाथराव तांदळे राहणार हिंगणी (खुर्द ), ता. जि. बीड हल्ली मुक्काम समता कॉलनी, मित्र नगर , के. एस. के. कॉलेज रोड, बीड. यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी दु:खद निधन झाले.

बीड शहरातील मित्र नगर भागात राहणारे चंद्रसेन तांदळे गेल्या काही काळापासून वृद्धापकाळाने आजारी होते. त्यांच्यावर उपचार सुरू असताना आज दिनांक २१ मे २०२६ गुरुवार रोजी सकाळी ०७:०० वाजता त्यांची प्राणज्योत मालवली.



त्यांच्या पार्थिवावर दुपारी ०१:०० वाजता भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. तांदळे कुटुंबीयांच्या दु:खात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६९६ दि.३०.१२.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुरज संजय मिठे, रा.बारसवाडा ता.अंबड जि.जालना** यांनी **स्वत:च्या** जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुरज संजय मिठे | स्वत: | १७.१२.२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३७६ दि.३०.०४.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **प्रदीप सिध्दार्थ लिहीणार, रा.काटखेडा ता.अंबड जि.जालना** यांनी **मुलीच्या** जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अमृता प्रदिप लिहीणार | मुलगी | १८.१०.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# वृक्षारोपण मोहिमेसाठी योग्य 'लँड बँक' तयार करा-जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

लातूर /प्रतिनिधी

राज्यात सन २०२६ ते २०४७ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या अत्यंत महत्त्वाकांक्षी ३०० कोटी वृक्षारोपण अभियानाच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील वृक्षारोपण योग्य जमिनीची 'लँड बँक' तयार करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आयोजित बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणा व विभागांना या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सूक्ष्म नियोजनाचे निर्देश दिले.

रोहयोचे उपजिल्हाधिकारी




संदीप कुलकर्णी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संजय इंगळे, लातूर शहर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, सामाजिक वनीकरण विभागाचे उपवन संरक्षक अमितराज जाधव, सहायक वनसंरक्षक मदन क्षीरसागर, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

वृक्षारोपणाची ही सर्व कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत राबविण्यात यावीत. या संपूर्ण मोहिमेमध्ये स्थानिक महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग निश्चित करण्यात यावा. त्यांच्यामार्फत रोपवाटिका निर्मिती, वृक्षलागवड व पुढील संगोपनाचे काम करून घेण्यात यावे, ज्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना हक्काचा रोजगार मिळून महिला सक्षमीकरणालाही बळ मिळेल, असे जिल्हाधिकारी म्हणाले.या बैठकीला विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, वनविभागाचे प्रतिनिधी आणि संबंधित यंत्रणांचे समन्वयक उपस्थित होते.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती, एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: २७६/२०२६**
**चंद्रकला विरूध्द - निरंक**
**(मार्फत ॲड एस.ए. दिंडे)**

**ज्याअर्थी मयत नामे नवनाथ पि. भानुदास कोकरे हे दिनांक १७.१०.२०२४ रोजी मौजे कवडगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.**

**अर्जदार**

**१. चंद्रकला प्र. नवनाथ कोकरे वय ७४ वर्षे धंदा-शेती रा. कवडगाव ता. गेवराई जि.बीड २ अहिल्याबाई भ्र. भगवान मार्कड वय ४५ वर्षे धंदा- शेती रा. तरटेवाडी ता. गेवराई जि.बीड ३. पार्वती प्र. बळीराम बिचकुले ३ वय ३८ वर्षे धंदा - शेती रा. बंगालीपिंपळा ता. गेवराई जि. बीड ४ लक्ष्मण पि.नवनाथ कोकरे, वय ३६ वर्षे धंदा - शेती रा. कवडगाव ता. गेवराई जि. बीड ५. द्रौपदाबाई ब्र. महादेव बिचकुळे, वय ४९ वर्षे, व्यवसाय - शेती रा. कवडगाव ता. गेवराई जि.बीड ६ रामेश्वर पि. नवनाथ कोकरे वय ३७ वर्षे धंदा - शेती रा. कवडगाव ता. गेवराई जि.बीड**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **नवनाथ पि.भानुदास कोकरे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.-/-/-** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
**पुढील तारिख -११/०६/२०२६**

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

### जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार रघुचंद्र पि.लक्ष्मणराव मस्के, रा.देवकी ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांची पत्नी **रेखा रघुचंद्र मस्के** यांचा जन्म दि.१५.०८.१९९६ रोजी रोहितळ येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, रोहितळ, ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय जन्म नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील जन्मधारकाचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, रोहितळ, ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता जन्माबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

पान १ वरुन...

**हिंगणी खुर्द येथील...**

चंद्रकांत शेळके यांनी गुरुवारी तब्बल दोन तास पायी चालत तुळजाभवानी मंदिर रस्ता, नागरगोजे वस्ती, आंधळे वस्ती आणि मुंडे वस्ती रस्त्यांची सविस्तर पाहणी केली. सर्व रस्ते अतिक्रमणमुक्त करून ते ग्रामस्थांसाठी खुले केले जातील, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. या पाहणी दौऱ्यादरम्यान हिंगणी खुर्दचे सरपंच संतोष तांदळे, हिंगणी खुर्द सोसायटीचे चेअरमन सचिन आंधळे यांच्यासह गावातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमच्यासाठी रस्ते महत्त्वाचे..!

हिंगणी खुर्द हे ऊस उत्पादक गाव आहे. शेतातील ऊस कारखान्याला पाठवण्यासाठी आणि दैनंदिन दळणवळणासाठी हे पानंद रस्ते आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. आमच्या मागणीमुळे प्रशासनाने स्वत: रस्त्याची पाहणी करण्यासाठी आमच्या शेतात आले. आमचा अनेक वर्षांचा प्रश्न सुटेल अशी आशा आहे

-सचिन आंधळे,
हिंगणी खुर्द सोसायटीचे चेअरमन

लवकरच सर्व रस्ते मोकळे केले जातील..!

ग्रामस्थांची अडचण लक्षात घेता आम्ही संपूर्ण परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. पानंद रस्ते हा शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यामुळे या रस्त्यांवरील सर्व अतिक्रमणे हटवून लवकरच हे रस्ते वाहतुकीसाठी पूर्णपणे मोकळे करण्याचे आदेश दिले आहेत.

-चंद्रकांत शेळके, तहसीलदार, बीड.

**बीड नगरपालिकेच्या निजामी....**

पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. सोशल मिडीयावर व्हायरल होत असलेल्या व्हिडीओ मधील प्रकाराच्या अनुषंगाने अशा प्रकारे भाजी विक्रेत्यांचा भाजीपाला फेकून देणे अथवा उचलून घेऊन येण्याच्या कोणत्याही सूचना पालिका प्रशासनाने संबंधितांना दिल्या नसल्याची बाब यामध्ये उघडकीस आली. विशेष म्हणजे सदर अतिक्रमण विरोधी कारवाई होताना स्वच्छता निरीक्षक या घटनेच्या वेळी तेथे उपस्थित नव्हते. त्यामुळे नगर परिषदेने या कारवाईचे समर्थन केले नाही. मात्र अशा प्रकारच्या घटना भविष्यात घडू नयेत या बाबत उपाययोजना करण्याचे निर्देश आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिले.

**बीड बायपासवरील....**

त्यांना फोनवरून माहिती दिली की, नेकनूर येथील संतोष बजरंग शिंदे याने आपल्या फेसबुक अकाउंटवरून हॉटेल दुबई पॅलेसबद्दल एक आक्षेपार्ह पोस्ट शेअर केली आहे.

फेसबुक पोस्टमधील खोटा दावा

शेख यांनी तात्काळ फेसबुक ओपन करून पाहिले असता, संशयित आरोपी संतोष शिंदे याच्या अकाउंटवर एक पोस्ट प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या पोस्टमध्ये असे लिहिले होते की, 'मांडवखेल परिसरात मोराची शिकार करणाऱ्या चार जणांना गावकऱ्यांनी पकडले असून ते पोलिसांच्या ताब्यात आहेत. तसेच या मोरांचे मांस बीड बायपासवरील दुबई पॅलेस या हॉटेलवर विकले जाते अशी नेकनूरमध्ये चर्चा आहे.

## माजलगावात छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकांसाठी प्रत्येकी १ कोटी निधीची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक व परिसर सुशोभीकरणासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत प्रत्येकी १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी धनंजय (पापा) सोळंके यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव नगरपरिषद हद्दीत आमदार प्रकाश सोळंके यांच्या माध्यमातून एस.टी. महामंडळाच्या जागेत ठराव मंजूर करून नवीन बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी १० बाय १० जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच जुने बसस्थानक परिसरात विश्वरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठीही १० बाय १० जागा निश्चित करण्यात आली आहे.

या दोन्ही स्मारकांच्या उभारणीसाठी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून फाउंडेशनसाठी निधी उपलब्ध करून दिला असून भूमिपूजनही पार पडले आहे. त्यामुळे आता स्मारकांची भव्य उभारणी व परिसराचे सुशोभीकरण करण्यासाठी शासनाने विशेष निधी द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.




धनंजय (पापा) सोळंके यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक व परिसरासाठी १ कोटी रुपये तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक व परिसरासाठी १ कोटी रुपये निधी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मंजूर करण्याची विनंती केली आहे. या मागणीमुळे माजलगाव शहराच्या सांस्कृतिक व सामाजिक वैभवात भर पडणार असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्रातर्फे पशुआरोग्य शिबिराचे आयोजन

माजलगाव /प्रतिनिधी

दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक २० मे २०२६ रोजी अंबाजोगाई तालुक्यातील मौजे सुगाव येथे पशु आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरामध्ये शेतकऱ्यांना गोआधारित शेती, सेंद्रिय शेती तसेच पशुधन व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री. बंडू मारुती शिंदे हे होते. यावेळी गावचे रोजगार सेवक श्री. अतुल अभिमान शिंदे, प्रगतशील शेतकरी श्री. महादेव मारुती शिंदे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे पशु तज्ञ डॉ. रवींद्र कोरके उपस्थित होते.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र कोरके यांनी सांगितले की, सध्याच्या परिस्थितीत शेती उत्पादन खर्चात मोठी वाढ होत असून शेतकऱ्यांनी गोआधारित व नैसर्गिक शेतीकडे वळणे काळाची गरज आहे. जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी माती परीक्षण करून त्या आधारे संतुलित खत व्यवस्थापन करावे. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर टाळून शेणखत, हिरवळीची खते, पिकांचे अवशेष, काडी-कचरा व इतर सेंद्रिय खतांचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, मराठवाडा भागातील जमिनींमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अत्यंत कमी होत चालले असून ते वाढविण्यासाठी सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने खाद्य व्यवस्थापन करणे तसेच नियमित दर तीन महिन्यांनी जंतनिर्मूलन करणे गरजेचे आहे. पशुधनाला वेळापत्रकानुसार लसीकरण केल्यास विविध संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण मिळते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिबिराचे उद्घाटन गावचे सरपंच श्री. बंडू मारुती शिंदे यांच्या हस्ते देशी गोवंश पूजन करून करण्यात आले. शिबिरादरम्यान पशुधनांना जंतनिर्मूलनाच्या मात्रा देण्यात आल्या. एकूण १६६ पशुधनांवर जंतनिर्मूलन उपचार करण्यात आले. या शिबिरात ४८ शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील प्रगतशील शेतकरी श्री. मारुती शिंदे व श्री. काकासाहेब अडसूळ यांनी विशेष सहकार्य केले.

# विभागीय आयुक्तांकडून मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

## पूरनियंत्रण, आरोग्य सेवा, वीजपुरवठा व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवा– विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर (विमाका)

आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील सर्व जिल्हा प्रशासनांनी आपत्ती व्यवस्थापन, पूरनियंत्रण, आरोग्य सेवा, वीजपुरवठा आणि नागरी सुविधांबाबत आवश्यक ती पूर्वतयारी पूर्ण करून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले.

विभागीय आयुक्तालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी मराठवाड्यातील जिल्हानिहाय मान्सूनपूर्व तयारीचा सविस्तर आढावा घेतला. महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, पोलीस अधीक्षक डॉ.विनयकुमार राठोड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी.एम., कर्नल नंदकिशोर खडसे, सह आयुक्त रिता मेत्रेवार, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुने , सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, प्रभारी सहायक आयुक्त (महसूल) सरिता सुत्रावे, उपायुक्त (पुरवठा) सुधाकर पवार यांच्यासह प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच बैठकीस विभागातील जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, पोलीस प्रशासन, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग, आरोग्य विभाग तसेच आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.शहरी व ग्रामीण भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी नालेसफाईची सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. दरवर्षी पाणी साचणाऱ्या ठिकाणांची विशेष पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या सूचना विभागीय आयुक्तांनी दिल्या.

नदीकाठच्या गावांमध्ये सतर्कता वाढविणे, पूरस्थिती निर्माण झाल्यास स्थलांतरासाठी सुरक्षित ठिकाणांची तयारी ठेवणे तसेच बचाव पथकांना सज्ज ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. पूरप्रवण गावांची अद्ययावत यादी तयार ठेवण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

महानगरपालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी जुन्या व धोकादायक इमारतींची पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करावी. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही, यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले.

रस्ते, पूल आणि जलनिस्सारण यंत्रणा दुरुस्त करा...



पावसाळ्यात वाहतुकीस अडथळा निर्माण होणारे रस्ते, पूल यांची पाहणी करून दुरुस्तीची कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आल्या. संवेदनशील ठिकाणी सूचना फलक लावणे, वाहतूक नियंत्रण व्यवस्था करणे आणि जलनिस्सारण यंत्रणा कार्यक्षम ठेवण्याबाबतच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

आपत्कालीन पथके सज्ज ठेवावीत...

वादळी वाऱ्यामुळे किंवा मुसळधार पावसामुळे वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना टाळण्यासाठी विद्युत यंत्रणांची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले. झाडांच्या धोकादायक फांद्या छाटणे, ट्रान्सफॉर्मर व वीजवाहिन्यांची दुरुस्ती तसेच तातडीच्या दुरुस्तीसाठी विशेष पथके सज्ज ठेवण्यास सांगण्यात आले.

आरोग्य विभागाला विशेष सूचना...

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी औषधसाठा उपलब्ध ठेवावा. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये व जिल्हा रुग्णालये येथे आवश्यक सुविधा सज्ज ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी तसेच प्रतिबंधात्मक आरोग्य मोहीम राबवा, असे निर्देश देण्यात आले.

२४७ नियंत्रण कक्ष व आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार ठेवा...

जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत २४७ नियंत्रण कक्ष आणि १०७७ टोल फ्री सेवा सुरू ठेवण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. जिल्हा, तालुका आणि गावस्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करून मॉक ड्रिल घेण्याचे निर्देशही देण्यात आले. पूरप्रवण गावांसाठी स्थलांतर योजना, सुरक्षित स्थळे, धान्यसाठा तसेच शोध व बचाव साहित्य सज्ज ठेवण्यास सांगण्यात आले.

दामिनी व सचेत ॲपद्वारे जनजागृती..

विज पडण्याच्या घटनांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी 'दामिनी' व 'सचेत' ॲपचा व्यापक प्रचार करण्याचे निर्देश देण्यात आले. ग्रामीण भागात विशेष जनजागृती मोहीम राबविण्यावर भर देण्याचे निर्देश देण्यात आले. आपत्तीग्रस्त भागात कायदा व सुव्यवस्था राखणे, वाहतूक नियंत्रण, मदत छावण्यांची सुरक्षा व्यवस्था आणि तातडीच्या प्रतिसादासाठी रॅपिड क्शन फोर्स सज्ज ठेवण्याच्या सूचना पोलीस प्रशासनाला देण्यात आल्या.

शेतकऱ्यांसाठी हवामान आधारित मार्गदर्शन..

कृषी विभागामार्फत हवामान आधारित पीक नियोजन मार्गदर्शन, पर्जन्यमापक यंत्रांची तपासणी आणि शेतकरी जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. मान्सूनपूर्व वादळी वाऱ्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा तसेच विजेपासून बचावासाठी आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले.

यासोबतच पशुसंवर्धन विभागाने जखमी जनावरांवर तातडीने उपचार, लसीकरण आणि पशुखाद्य उपलब्ध ठेवावे, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले. जलसंपदा विभागामार्फत धरणातील पाणीपातळी व विसर्गाचे सतत निरीक्षण केले जाणार असून पूरपूर्व सूचना प्रणाली कार्यान्वित ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. पुलांवर धोका पातळी चिन्हांकित करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

मान्सून काळात सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवून काम केल्यास आपत्तीजन्य परिस्थितीवर प्रभावी नियंत्रण मिळविता येईल. नागरिकांना वेळेवर मदत आणि सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी असल्याचे विभागीय आयुक्तांनी स्पष्ट केले.

यावेळी आर्मीचे कर्नल नंदकिशोर खडसे यांनी आपत्तीच्या कालावधीत आर्मीकडून करण्यात येत असलेल्या उपाययोजना तसेच बचाव यंत्रणेबाबत माहिती दिली.

# डॉ. शेख रुखसाना अजीजसाब यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप

माजलगाव / प्रतिनिधी

माजलगाव शहरातील केसापुरी वसाहत येथील रहिवासी असलेली व सध्या छत्रपती संभाजीनगर येथे औरंगाबाद बी.एड.कॉलेज छत्रपती संभाजीनगर या महाविद्यालयाला प्राचार्य म्हणून कार्यरत असलेली डॉ.शेख रुखसाना अजीजसाब यांनी व त्यांच्या सहकारी गटाने दृष्टीहीन, श्रवणदोष असलेले व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विकसित केलेल्या फोल्डेबल मल्टी - सेन्सर इंटरॅक्टिव्ह लर्निंग असिस्टिव्ह डिव्हाइस सिस्टीम ( त्रेश्रवरलश्रश चींश्रींळ-डशपीी खपींशीरलींळींश ङशरीपळपस -ीीळींींळींश ऊशींळलश ड्रींशा ) या उपकरणाला यू.के.पेटंट ( णघ झरींशपीं ) कार्यालयाकडून मान्यता मिळाली आहे. संबंधित उपकरणा द्वारे दृष्टीहीन, श्रवणदोष व



विशेष गरजा असलेले विद्यार्थी पाहणे, ऐकणे आणि स्पर्श करणे या तिन्ही माध्यमांतून अध्ययन करू शकतात, सदरील उपकरण हे विशेष शाळा व विशेष बी.एड. प्रशिक्षणार्थ्यांसाठी उपयुक्त आहे. हे उपकरणाची सहजपणे घडी घालता येते त्यामुळे हे वापरण्यात अत्यंत सुलभ आहे तसेच प्रवासामध्ये सहजपणे घडी घालून लहान आकारामध्ये ठेवता येते. माजलगाव केसापुरी वसाहत सारख्या एका लहानश्या वसाहती पासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत मारलेल्या या झेपामुळे त्यांच्यावर त्यांचे मित्रपरिवार, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या कार्यामुळे माजलगाव ,छत्रपती संभाजीनगर व त्यांच्या महाविद्यालयाचा सन्मान नक्कीच वाढला आहे. हे उपकरण विकसित करण्यामध्ये डॉ.शेख रुखसाना अजीजसाब यांच्या व्यतिरिक्त डॉ.शेख सुभान हसन, डॉ. बाळासाहेब किलचे, डॉ. योगेंद्र कुमार पवार, डॉ.अमरदीप असोलकर, डॉ.मीनाक्षी पाटील व डॉ. शुभांगी पाटील यांचा सहभाग आहे.

# रोहयो मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत आज शिवसेनेची महत्त्वपूर्ण बैठक

**शिवसैनिकांनी उपस्थित रहावे : जगताप, मुळूक, गलधर, नवले**

बीड /प्रतिनिधी

जिल्हा शिवसेनेच्या वतीने आज शुक्रवार (दि.२२) रोजी सकाळी ११:०० वाजता शहरातील हॉटेल ऑलिव्ह येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे रोहयो मंत्री तथा बीड जिल्हा शिवसेनेचे संपर्कमंत्री भरत शेठ गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक पार पडणार आहे.

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीड जिल्ह्याच्या संपर्कमंत्री पदी भरत गोगावले यांची नियुक्ती केल्यानंतर त्यांचा हा पहिलाच बीड दौरा आहे. त्यामुळे पक्ष संघटना, कार्यकर्त्यांशी संवाद आणि आगामी काळातील संघटनात्मक नियोजनाच्या दृष्टीने या बैठकीकडे लक्ष लागले आहे.

या बैठकीस शिवसेनेचे नेते संजय माशीलकर, संपर्कप्रमुख मनोज शिंदे, मराठवाडा सचिव अशोक



पटवर्धन, माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. संघटना अधिक बळकट करण्याबरोबरच पक्षाच्या विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होणार आहे.

दरम्यान, जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर आणि चंद्रकांत नवले यांनी केले आहे.फ

# जिल्हा परिषद उंद्री प.दे. येथील शाळेचे शिष्यवृत्ती परीक्षेत मोठे यश

मुखेड /प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उंद्री (प.दे) येथील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ५ वी मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.शाळेतील आठ विद्यार्थी परीक्षेस बसले होते,त्यापैकी सात विद्यार्थी पात्र ठरले आहेत.त्यामुळे गावासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यामध्ये शिरगीरे प्रतिभा हानमंत हिने ३०० पैकी २०८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.तसेच वडजे प्रतीक्षा विठ्ठल हिने १९० गुण,राठोड स्वरा शिवाजी व पवार जगदिश प्रभाकर यांनी प्रत्येकी १८६ गुण,पवार प्रथमेश सुरेश याने १७८ गुण,राठोड परी विजय हिने १४८ गुण तर पंदीलवाड किशन मारोती याने १३४ गुण मिळवून यश संपादन केले.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल मुख्याध्यापक सौ.संतपुरे एस.व्ही.,मार्गदर्शक श्री.लासुणे एस.डी. व सौ.केळगिरे एस.बी. यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री.सोनकांबळे देवानंद चांदोबा व सर्व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३३३ दि.२९.०४.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री योगेश साहेबराव मुळे, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | योगेश साहेबराव मुळे | स्वतः | ०५.०६.१९९२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३०३ दि.२९.०४.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **रफिक कडु शेख, रा.जामखेड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | साद रफिक शेख | मुलगा | २४.१०.२०१३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३६५ दि.३०.०४.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **लक्ष्मण राधाकिसन कळकटे, रा.वडीकाळ्या, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लक्ष्मण राधाकिसन कळकटे | स्वतः | २०.०१.१९९५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१७८ दि.०४.०५.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **जालिंदर गोपीनाथ जाधव, रा.झिरपी तांडा (कैलास नगर) ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जालिंदर गोपीनाथ जाधव | स्वतः | १५.०६.१९६४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तहसीलदार, मामलेतदार तथा कार्यकारी दंडाधिकारी**
**कार्यालय अंबड**
**प्रशासकीय इमारत ता.अंबड**
**जा.क्र.२०२६/जमा-१/कवी- ३९७ दिनांक ०७.०५.२०२६**

**जाहीर प्रगटन**

ज्याअर्थी मौजे हस्तपोखरी येथील गट नं. २४९ मधील रस्त्याबाबत. अर्जदार एकनाथ मारोती उदेवाल रा. हस्तपोखरी ता.अंबड जि. जालना यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार, तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.त्यानुसार दिनांक ०७.०५.२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात अली होती. तथापी खालील प्रमाणे गैरअर्जदार सदर सुनावणीसाठी हजर राहत नाहीत.

प्रतीवादी :- १. पंढरीनाथ जगन्नाथ जगताप
२. संतोष प्रल्हाद जगताप
३. भगवान सीताराम रखुंदे
रा. हस्तपोखरी ता. अंबड जि.जालना

आपण वरिल प्रमाणे गैरअर्जदार सुनावणीसाठी गैरहजर आहेत मौजे हस्तपोखरी येथील गट नं. २४९ मधील रस्त्याबाबत निर्णय पारित करणे आवश्यक आहे. सबब या द्वारे आपणास जाहीर नोटीस देवुन कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिध्द झाल्याचे तारखे पासुन ०७ दिवसाचे आत अथवा पुढील सुनावणी दिनांक २१.०५.२०२६ रोजी दु. २.०० वाजता आपले म्हणणे तहसीलदार अंबड यांचे न्यायालयात पुराव्यासह समक्ष दाखल करावेत. आपण मुदतीमध्ये किंवा व्यक्तीशः हजर राहुन आपले म्हणणे दाखल केले नाही. त्यानुसार उपलब्ध अभिलेखे तपासुन गुणवत्तेनुसार सदर प्रकरणात निर्णय आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक- ०७/०५/२०२६

स्वाक्षरित/-
तहसीलदार अंबड

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२४३ दि.१३.०३.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **आबासाहेब भाऊराव निर्मळ, रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नात**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | दिव्या विजय चव्हाण | नात | ०३.०३.२०२३ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२३९ दि.११.०३.२०२६**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **जावेद इसाक शहा, रा.हरतखेडा ता.अंबड** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जावेद इसाक शहा | स्वतः | ०५.१२.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२९५ दि.०२.०४.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **प्रदीप सिध्दार्थ लिहीणार, रा.काटखेडा ता.अंबड जि.जालना** यांनी **मुलीच्या** जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आकांक्षा प्रदिप लिहीणार | मुलगी | २७.०७.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०२/०४/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# ई-फार्मसीच्या बेकायदेशीर कारभारा विरोधात बीड शहरातील औषध विक्रेत्यांचा कडक बंद

बीड /प्रतिनिधी - देशभरात सुरू असलेल्या बेकायदेशीर ऑनलाइन औषध विक्री आणि ई-फार्मसी पोर्टल्सच्या विरोधात ऑल इंडिया ऑर्गनेशन ऑफ केमिस्ट अँण्ड ड्रगगिसट (-खजउऊ) यांनी पुकारलेल्या राष्ट्रव्यापी आंदोलनाला बीड जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी, २० मे रोजी बीड शहरातील सर्व औषध विक्रेत्यांनी आपली दुकाने पूर्णपणे बंद ठेवून केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात निषेध नोंदविला.

बीड तालुका केमिस्ट अँण्ड ड्रगगिसट असोसिएशन यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या बंदमुळे परिसरातील औषध बाजारपेठ पूर्णपणे ठप्प झाली असून, औषध विक्रेत्यांनी रस्त्यावर उतरून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

औषध विक्रेत्यांनी आरोप केला की, ऑनलाइन औषध विक्रीमुळे औषध उत्पादन व वितरण क्षेत्रातील नियमांचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होत असून, याचा थेट परिणाम तरुण पिढीच्या आरोग्यावर होत आहे. केंद्र सरकारने जारी केलेले विविध नियम, अधिसूचना तसेच कोविड काळातील तरतुदींचा आधार घेत ई-फार्मसी कंपन्यांकडून सुरू असलेल्या कथित बेकायदेशीर व्यवसायाकडे संघटनेने प्रशासनाचे लक्ष वेधले.

सरकार आणि प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने अखेर देशव्यापी प्रतीकात्मक बंद पुकारण्याची वेळ आल्याचे




संघटनेने म्हटले आहे.

या आंदोलनात बीड जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

सर्वसामान्य नागरिक आणि रुग्णांना कोणतीही गैरसोय होऊ नये याची विशेष काळजी संघटनेकडून घेण्यात आली. बंद दरम्यान एखाद्या रुग्णाला तातडीच्या वैद्यकीय सेवांची गरज भासल्यास जिल्हा व तालुका संघटनेचे पदाधिकारी समन्वय साधून मदत करतील, असे आश्वासन देण्यात आले.

या आंदोलनाचे नेतृत्व संघटनेचे अध्यक्ष अरुण दादा बरकसे, सचिव सुरेश पवार, कोषाध्यक्ष किशोर मुथा, कार्यकारणी सदस्य अब्दुल राफे, तालुका अध्यक्ष पांडुरंग कुरे,तसेच संघटनेच्या अन्य पदाधिकाऱ्यांनी केले. प्रशासनाकडून सकारात्मक सहकार्य मिळेल, अशी अपेक्षाही संघटनेने व्यक्त केली आहे.

# यमगरवाडी जोड रस्त्यासाठी १३७ लक्ष रुपयांचा निधी मंजूर - आ. विजयसिंह पंडित

## आश्वासनपूर्ती मुळे ग्रामस्थांकडून आ. पंडित यांचे आभार

गेवराई (प्रतिनिधी) : प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेमधून गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे यमगरवाडी जोड रस्त्याच्या डांबरी नूतनीकरण कामासाठी १३७.२९ लक्ष रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. विधानसभा निवडणुकीतील प्रचारादरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी यमगरवाडी ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनाची पूर्ती या माध्यमातून झाली असल्याचे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या कामाच्या मंजुरीबाबत त्यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय आणि महायुती सरकारचे जाहीर आभार व्यक्त केले आहेत तर यमगरवाडी ग्रामस्थांनी आश्वासनपूर्तीबद्दल आ. विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले आहेत.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या चौथ्या टप्प्यातील सन २०२६ - २७ मधील महाराष्ट्र राज्यातील कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश १८ मे रोजी निर्गमित झाले. या मध्ये बीड जिल्ह्यातून केवळ प्रजिमा २० ते यमगरवाडी या जोड रस्त्याच्या एकमेव कामाचा समावेश आहे. प्रजिमा २० ते यमगरवाडी या रस्त्याच्या डांबरी नूतनीकरण कामाला १३७.२९ लक्ष रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. मौजे यमगरवाडी ग्रामस्थांनी आमदार विजयसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले आहेत.

गेवराई विधानसभा मतदारसंघातील मौजे यमगरवाडी या जोड रस्त्याचे डांबरीकरण आणि रस्त्यावरील पुलांची कामे करून देण्याचे आश्वासन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान दिले होते. या रस्त्याच्या कामाच्या मंजुरीमुळे हे आश्वासन पूर्ण होत असल्याचे समाधान होत असुन निवडणूक जाहीरनाम्यातील प्रत्येक आश्वासन पूर्ण करण्याच्या अनुषंगाने आपण नियोजनपूर्वक काम करत असल्याचे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.

पुढे बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, ग्रामीण भागात दळणवळणाच्या सक्षम सुविधा उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने काम सुरू आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतही गेवराई मतदार संघातील अनेक कामे प्रस्तावित करण्यात आले आहेत त्या कामांनाही लवकरच मंजुरी मिळणे अपेक्षित असल्याचे सांगून ग्रामीण रस्त्यांची कामे अतिशय दर्जेदार करण्यावर आपला भर असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

या कामास मंजुरी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी



फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. श्रीमती सुमित्रावहिनी अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे यांच्यासह केंद्रीय ग्रामविकास मंत्रालय आणि महायुती सरकारचे आ. विजयसिंह पंडित यांनी जाहीर आभार व्यक्त केले आहेत.

# ई-फार्मसीच्या बेकायदेशीर कारभाराविरोधात अंबाजोगाईत औषध विक्रेत्यांचा कडकडीत बंद

उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

अंबाजोगाई:प्रतिनिधी

देशात आणि राज्यात इंटरनेटच्या माध्यमातून सुरू असलेल्या बेकायदेशीर ऑनलाइन औषध विक्री आणि ई-पोर्टलच्या विरोधात अखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने (-खजउऊ) पुकारलेल्या देशव्यापी आंदोलनाला अंबाजोगाई तालुका आणि बीड जिल्ह्यात तीव्र प्रतिसाद मिळाला आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून आज, बुधवार दिनांक २० मे रोजी अंबाजोगाई येथील औषध विक्रेत्यांनी आपापली प्रतिष्ठाने पूर्णपणे बंद ठेवून केंद्र व राज्य शासनाचा निषेध नोंदवला. अंबाजोगाई तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेच्या वतीने आज उपविभागीय अधिकारी (एसडीएम) यांना मागण्यांचे




सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. या देशव्यापी बंदमुळे परिसरातील औषध बाजारपेठ पूर्णपणे ठप्प झाली असून, शासनाचे लक्ष वेधण्यासाठी औषध विक्रेते रस्त्यावर उतरले आहेत.ऑनलाइन औषध विक्रीमुळे औषध निर्मिती आणि वितरण क्षेत्रातील नियमांचे सर्रास उल्लंघन होत असून, यामुळे तरुण पिढीच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी केला आहे. केंद्र सरकारने या संदर्भात जारी केलेले विविध नियम आणि अधिसूचना, तसेच कोविड काळातील तरतुदींचा आधार घेत ई-फार्मसी कंपन्यांकडून बेकायदेशीर व्यवसाय सुरू असल्याकडे संघटनेने प्रशासनाचे लक्ष वेधले. या गंभीर समस्येबाबत संघटनेच्या वतीने यापूर्वी अनेकदा संबंधित केंद्रीय मंत्री, राज्यमंत्री आणि उच्चपदस्थ प्रशासकीय अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून निवेदने देण्यात आली होती, तसेच या धोक्याची जाणीव करून देण्यात आली होती. मात्र, एवढे प्रयत्न करूनही शासन आणि प्रशासनाकडून नेहमीच नकारात्मक किंवा उदासीन भूमिका घेतली गेल्यामुळे अखेर संपूर्ण देशभरात हा लाक्षणिक बंद पुकारण्याची वेळ औषध विक्रेत्यांवर आली आहे.अंबाजोगाई तालुका आणि बीड जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी या बंदमध्ये सक्रिय आणि उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. या आंदोलनाची तीव्रता लक्षात आणून देण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही या संदर्भातील सविस्तर निवेदनपत्र माहितीसाठी आणि योग्य त्या कायदेशीर कारवाईसाठी पाठवण्यात आले असून, त्याची प्रत स्थानिक प्रशासनाकडे सुपूर्द करण्यात आली आहे. आपल्या रास्त मागण्या आणि औषध विक्रेत्यांच्या भावना केंद्र व राज्य सरकारपर्यंत तातडीने पोहोचवाव्यात, अशी नम्र विनंती संघटनेच्या वतीने स्थानिक महसूल प्रशासनाला करण्यात आली आहे.दरम्यान, या देशव्यापी बंदच्या काळात सर्वसामान्य नागरिक आणि रुग्णांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी संघटनेने विशेष काळजी घेतली आहे. बंदच्या काळात जर एखाद्या रुग्णाला अत्यंत तातडीच्या व अत्यावश्यक औषध सेवेची गरज भासली, तर जिल्हा व तालुका संघटनेचे अध्यक्ष, सचिव आणि इतर सर्व पदाधिकारी योग्य ते समन्वय साधून रुग्णांना मदत करण्यासाठी तत्पर राहतील, असे आश्वासन देण्यात आले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व अंबाजोगाई तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष मुस्तफा यासीन शेख आणि सचिव पवन पुरुषोत्तम चोकडा यांच्यासह तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी केले असून, प्रशासनाकडून सकारात्मक सहकार्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# अहिल्यानगर.विधानपरिषदेसाठी घुले, तनपुरे की भाजपचे धक्कातंत्र ?

अहिल्यानगर/ प्रतिनिधी

नगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेची रिक्त जागा भरली जाणार असल्याने जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी हालचाल सुरू झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिलेल्या या जागेवर आता महायुतीतच मोठी रस्सीखेच रंगण्याची चिन्हे आहेत.या मतदारसंघावर दिवंगत माजी आमदार अरुण जगताप यांचे दीर्घकाळ वर्चस्व राहिले. आघाडी सरकारच्या काळात त्यांनी सलग दोनदा विजय मिळवत राष्ट्रवादी काँग्रेसचा दबदबा कायम ठेवला होता. मात्र, राज्यातील राजकीय उलथापालथीनंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेली फूट, त्यानंतर महायुतीची झालेली नव्याने उभारणी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील बदललेले संख्याबळ यामुळे आता परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसत आहे.

राष्ट्रवादीच्या अजित पवार गटकडून माजी आमदार राहिलेले चंद्रशेखर घुले हे गेल्या अनेक दिवसांपासून इच्छुक आहेत. परंतु निवडणूक जाहीर होत नसल्यामुळे त्यांची जिल्हा बँकेचे अध्यक्ष पदावर वर्णी लागली. दरम्यान नुकतेच झालेल्या राहुरी पोटनिवडणुकीत देखील अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संपर्कातून राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत शरद पवार गटाचे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी भाजपला अनुकूल भूमिका घेत निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे भाजपचे अक्षय कर्डिले यांना विजय सहजसाध्य झाला. तनपुरे यांना विधान परिषदेसाठी शब्द मिळाल्याची जोरदार चर्चा त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये होत आहे.या मतदारसंघात आता भाजपचे संख्याबळ वाढलेले आहे. त्यामुळे पक्षाकडेच ही जागा असावी अशी आग्रही भूमिका जिल्हा भाजपकडून मांडली जाऊ लागली आहेनगर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेची रिक्त जागा भरली जाणार असल्याने जिल्ह्याच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी हालचाल सुरू झाली आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व राहिलेल्या या जागेवर आता महायुतीतच मोठी रस्सीखेच रंगण्याची चिन्हे आहेत.

# नागपूर येथील राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेस राजेश घोडे यांना विशेष निमंत्रण

माजलगांव (प्रतिनिधी):-नागपूर येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात रविवारी (दि. २४) सकाळी १० वाजता राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, शैक्षणिक व आरक्षण विषयक विविध मुद्द्यांवर या परिषदेत सखोल चर्चा होणार असून राज्यभरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

परिषदेचे उद्घाटन माजी सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांच्या हस्ते होणार आहे. या परिषदेस आझाद क्रांती सेनेचे प्रमुख राजेश घोडे यांना विशेष निमंत्रण देण्यात आले असून ते उपवर्गीकरण, सामाजिक न्याय आणि मागास घटकांच्या हक्कांबाबत आपले विचार मांडणार आहेत. त्यामुळे परिषदेकडे राज्यभरातील सामाजिक संघटनांचे विशेष लक्ष लागले आहे.

या परिषदेत प्रा. सुकुमार कांबळे, प्रा. रामचंद्र भराडे, डॉ. अंकुश गोतावळे, प्रा. मुकेश दुपारे, डॉ. रवींद्र मुंद्रे, प्रा. किशोर बिरला, डॉ. पुरणचंद्र मेश्राम, प्रा. संदेश वाघ, रत्नसिंग बावरी, जयसिंग कुछवाह, नागेश मानकर, विशाल लारोकर, भय्याजी खैरकर तसेच लहु सेनेचे संयोजक संजय कठाळे आदी मान्यवर विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

उपवर्गीकरणाच्या संदर्भातील सामाजिक, शैक्षणिक आणि घटनात्मक पैलूंवर चिंतन करण्यासाठी ही परिषद महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. राज्यातील विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, अभ्यासक, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली.

परिषदेला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सचिन मून, संजय कठाळे, प्रशांत शहारे, राजेश भास्कर, भय्याजी खैरकर आणि प्रा. विनोद बागडे यांनी केले आहे.

ागपूर येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात रविवारी (दि. २४) सकाळी १० वाजता राज्यस्तरीय उपवर्गीकरण चिंतन परिषदेचे



आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक, शैक्षणिक व आरक्षण विषयक विविध मुद्द्यांवर या परिषदेत सखोल चर्चा होणार असून राज्यभरातील अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था केज संचलित
जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय केज ता. केज जि. बीड

पाहिजेत

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित व झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था केज संचलित जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय केज येथे कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील प्राचार्य, सहा. प्राध्यापक, शा.शि. संचालक, ग्रंथपाल ही पूर्णवळ पदे भरावयाची आहेत. तरी पात्र उमेदवारांनी आपले अर्ज शैक्षणिक पात्रतेच्या छायांकित प्रतीसह जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून 15 दिवसांचे आत टपालाने किंवा प्रत्यक्ष सचिव झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था केज संचलित, जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय केज ता. केज जि. बीड 431123 या ठिकाणी सादर करावेत.

| अं.क्र | पदनाम | विषय | रिक्तपदे | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | | १ | अराखीव-१ |
| २. | ग्रंथपाल | | १ | अनु जाती-०२ |
| ३. | सहा.प्राध्यापक | शा.शि.संचालक | १ | अनु जमाती-०१ |
| ४. | सहा.प्राध्यापक | रसायनशास्त्र | ५ | विजा.अ.-०१ |
| ५. | सहा.प्राध्यापक | भौतिकशास्त्र | २ | भज ब -०१ |
| ६. | सहा.प्राध्यापक | वनस्पतीशास्त्र | ३ | भज क -०१ |
| ७. | सहा.प्राध्यापक | प्राणिशास्त्र | ३ | भज ड -०१ |
| ८. | सहा.प्राध्यापक | गणित | २ | इमाव-०४ |
| ९. | सहा.प्राध्यापक | संगणकशास्त्र | २ | आदुघ-०२ |
| १०. | सहा.प्राध्यापक | सुक्ष्मजीवशास्त्र | २ | अराखीव-०८ |

अटी व शर्तीः- 1) प्राचार्य पदाची शैक्षणिक पात्रता विद्यापीठ आयोग नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजीनगर यांचे नियमानुसार राहील. 2) सहायक प्राध्यापकांसाठी शैक्षणिक पात्रता युजीसी, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन निर्णय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिपत्रकानुसार (NET/SET/Ph.D) लागू राहील. 3) मागासवर्गीय अर्जदारांनी संस्थेचे अध्यक्ष यांना सादर केलेल्या अर्जाची एक प्रत उपकुलसचिव, विशेष कक्ष, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना पाठवावी. 4) शा. नि.क्र. संकीर्ण 1096/प्र.क्र.30/का-2 दि.01 ऑगस्ट 1997 प्रमाणे महिलांसाठी 30% आरक्षण राहिल 5) शासन परिपत्रक क्रमांक दिव्यांग 2018/प्र.36/14/16-3, मंत्रालय, मुंबई दिनांकः 28 मे 2019 प्रमाणे दिव्यांगासाठी 4% आरक्षण राहील 6) शा. नि.क्र. एन.जी. सी. 1298 (4619) / युनी-4 दि. 11 डिसेंबर 1999 प्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती साठी पदव्युत्तर पदवीसाठी 55% गुणांची अट शिथिल करून 50% करण्यात आलेली आहे. 7) आरक्षण अधिनियम-2001 (2004) प्रमाणे विजा-अ, भज-ब, व भज-ड अंतर्गत परिवर्तनीय आहे. ४) एआयसीटी / एनसीटीई अधिपत्याखालील संस्था / महाविद्यालयांनी त्यांच्या नियमानुसार कार्यवाही करावी. १) शा.नि.क्र. युएसजी 2008 / (21) / विशि-4, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई 32 दि. 14 नोव्हेंबर 2003 प्रमाणे दिव्यांग उमदेवाराबाबत पदव्युत्तर पदवीसाठी 65% गुणांची अट शिथिल करून 50% करण्यात आलेली आहे. 10) अराखीव पदांसाठी मागासवर्गीय उमेदवारांना अर्ज करता येईल, अनारक्षित पदे गुणवत्तेनुसार भरण्यात यावीत, 11) शासन निर्णय दिनांक 03 एप्रिल 2018 व 04 डिसेंबर 2018 नुसार अनाथांसाठी 1% आरक्षण राहील. 12) खुल्या प्रवर्गातील एकुण जागेपैकी 10% जागा आर्थिक दृष्ट्या मागास उमदेवारांना असतील. 13) उमेदवारांनी मुलाखती दिवशी मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे.

शुक्रवार
दिनांक २२ मे २०२६

सचिव
झुंजार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, केज

# बीड नगरपालिकेसाठी ४८ करोड रुपयांचा निधी दिल्याबद्दल

## मोदी सरकार आणि फडणवीस सरकारचे आभार - अँड. नगरसेवक गोविंद शिराळे

बीड प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या माध्यमातून बीड शहरासाठी तब्बल ४८ कोटी रुपयांचा निधी पाणीपुरवठा व स्वच्छता या साठी उपलब्ध करून दिल्याबद्दल मोदी साहेबांचे आणि देवाभाऊचे खूप खूप आभार असे प्रसिद्धीस दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून बीड नगरपालिकेचे स्वीकृत नगरसेवक अँड. गोविंद शिरोळे पाटील यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.



पुढे बोलताना नगरसेवक गोविंद शिराळे म्हणाले की, नगरपालिकेला ४८ कोटी रुपयाचा निधी प्राप्त होण्यामागे महाराष्ट्राच्या रणरागिनी पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचे खूप मोठे योगदान आहे. तसेच बीड नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे साहेब व भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा अध्यक्ष शंकरराव देशमुख साहेब तसेच सर्जेराव तात्या तांदळे व भारतीय जनता पार्टीचे नेते मा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील सह या सर्वांचा ४८ रुपये करोड निधी बीड नगरपालिकेला मिळण्यासाठी केलेला खूप मोठा प्रयत्न यशस्वी झाला आहे. याचे बीडकरांना खूप मोठे समाधान आहे. निधी प्राप्त करण्यासाठी हा पाठपुरावा करण्यामध्ये वरील सर्वांचा खूप मोठा सहभाग आहे. आता या निधीचा सदुपयोग चांगल्या कार्यासाठी होणार आहे.

# अंतर्मनात भगवंताविषयी निस्वार्थ भाव ठेवूनभक्ती केली की उद्धार होतोच - ह.भ.प. केशवदास वैष्णव महाराज

बीड /प्रतिनिधी

येथून जवळच असलेल्या मुक्ताई नगर येथे अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेला श्रीराम कथा सोहळा मोठ्या भक्तिमय वातावरणात सुरू आहे.

या कथा सोहळ्याचे श्रवण करण्यासाठी बीड येथून महावीर बोरा, कुलकर्णी, निवृत्ती महाराज मुंडे , साईनाथ दुधाळ, तसेच पंचक्रोशीतील अनेक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कथेला संगीताची साथ गायक म्हणून ह.भ.प. सुग्रीव महाराज यांचे सुरेल गायन आणि उत्कृष्ट तबलावादक ह.भ.प. रामेश्वर महाराज जाधव यांची साथ लाभत आहे. या राम कथेमुळे



संपूर्ण परिसर सध्या रामभक्तीमध्ये तल्लीन झालेला दिसून येत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# ज्येष्ठ विधिज्ञ ॲड.मीर फरकुंदअली उस्मानी साहेब यांचे निधन

### बेधडक व्यक्तिमत्त्व, न्यायासाठी लढणारा योद्धा आणि समाजातील एक तेजस्वी दीप हरपला

अंबाजोगाई /प्रतिनिधी

आज केवळ अंबाजोगाईच नव्हे, तर संपूर्ण बीड जिल्हा आणि महाराष्ट्र एका अशा व्यक्तिमत्त्वाच्या निधनाने शोकसागरात बुडाला आहे, ज्यांची उणीव अनेक वर्षे प्रकर्षाने जाणवत राहील. अंबाजोगाई वकील संघाचे ज्येष्ठ विधिज्ञ मरहूम मीर फरकुंद अली उस्मानी साहेब यांच्या निधनाने न्यायव्यवस्था, सामाजिक क्षेत्र आणि सर्वसामान्य समाजमनाला मोठा धक्का बसला आहे.

त्यांनी आयुष्यभर ज्ञान, न्याय, निर्भीडपणा आणि समाजसेवेचा जो आदर्श निर्माण केला, तो पुढील पिढ्यांसाठी कायम प्रेरणादायी ठरणार आहे.उस्मानी साहेब हे केवळ वकील नव्हते, तर दूरदृष्टी असलेले विचारवंत, अन्यायाविरुद्ध निर्भयपणे उभे राहणारे नेतृत्व आणि हक्क व न्यायाचे खरे रक्षक होते. त्यांनी भारत आणि महाराष्ट्रातील अनेक सरकारांचे कार्यकाळ पाहिले, बदलते कायदे, बदलती राजकीय परिस्थिती आणि काळाचे चढ-उतार अत्यंत जवळून अनुभवले. मात्र प्रत्येक काळात त्यांचा एकच सिद्धांत होता. सत्यासाठी आवाज उठवणे, अन्यायाविरोधात ठाम उभे राहणे आणि समाजहितासाठी संघर्ष करणे.

ज्या धोरणांमुळे जनतेचे नुकसान होत आहे किंवा समाजहित धोक्यात येत आहे, असे त्यांना वाटायचे, त्या प्रत्येक प्रश्नावर ते अत्यंत स्पष्ट, तर्कशुद्ध आणि निर्भीड भूमिका मांडत असत. कोणत्याही दबावापुढे किंवा तडजोडीपुढे झुकणे त्यांच्या स्वभावात नव्हते. महाराष्ट्रभर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आदराने पाहिले जात होते. ते आपल्या समाजाचे बेधडक नेते होते; मात्र त्यांची विचारसरणी कोणत्याही एका समाजापुरती मर्यादित नव्हती. त्यांची बांधिलकी मानवता, न्याय आणि सामाजिक समतेशी होती.

त्यांनी प्रत्येक स्तरावर न्यायासाठी संघर्ष केला. न्यायालयाची चौकट असो किंवा समाजाचा लढा, जिथे जिथे हक्क आणि न्यायाची गरज भासली, तिथे उस्मानी साहेब आपल्या बुलंद आवाजासह, ठोस युक्तिवादासह आणि प्रखर धैर्यासह उभे राहिले. त्यांनी समाजाला शिकवले की, वकिली हा केवळ व्यवसाय नसून पीडित आणि वंचितांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे



प्रभावी माध्यम आहे.

अनेकांनी त्यांच्याकडून बोलण्याची शैली शिकली, अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा घेतली आणि वकिलीचे ज्ञान आत्मसात केले. त्यांचा स्वभाव कधीकधी कठोर वाटू शकत होता, पण त्यामागची भावना नेहमीच समाजहित, सत्य आणि न्यायासाठीच होती.

आज समाजाने एक निर्भीड मार्गदर्शक, अन्यायाविरुद्ध लढणारा बुलंद आवाज आणि न्यायाच्या मार्गावरील खरा योद्धा गमावला आहे. त्यांची जागा सहज भरून निघणारी नाही. मात्र त्यांचे कार्य, त्यांचे विचार, त्यांचे ज्ञान आणि त्यांनी दिलेली शिकवण सदैव जिवंत राहील.

काही माणसं शरीराने जातात, पण त्यांचा विचार कधीच मरत नाही.न्यायासाठी उठलेला आवाज काळाच्या पलीकडेही घुमत राहतो. मातीमध्ये विलीन झाल्यानंतरही जी माणसं लोकांच्या हृदयात जिवंत राहतात,अशी व्यक्तिमत्त्वे कधीच व्यर्थ जात नाहीत.आणि याच वेळी एक प्रसिद्ध शेर आठवतो,हजारो वर्षे नरगिस स्वतःच्या बेनुरीवर रडत राहते, मोठ्या मुश्किलीनंतरच बागेत एखादा दीदारवर जन्माला येतो. मरहूम मीर फरकुंद अली उस्मानी साहेब यांनी आपल्या आयुष्यात न्याय, धैर्य आणि बेधडकपणाचा जो आदर्श निर्माण केला, तो कायम स्मरणात राहील. लोक निघून जातात, पण आठवणींचा प्रवास कायम राहतो; काही व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव आयुष्यभर मनावर कोरला जातो. अल्लाह तआला मरहूमांना जन्नतुल फिरदौसमध्ये उच्च स्थान देवो, त्यांच्या चुकांची माफी करो आणि त्यांच्या परिवाराला, चाहत्यांना तसेच संपूर्ण समाजाला हे दुःख सहन करण्याची ताकद प्रदान करो.

# भोकरदनमध्ये शिवसेनेचे जोरदार शक्तीप्रदर्शन

संजय राऊतांवरचे आरोप म्हणजे राजकीय सूड- महेश पुरोहित यांचा घणाघात

भोकरदन इसरारखान पठाण :-

राज्यातील राजकीय वातावरण तापलेले असतानाच भोकरदन शहरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांनी खासदार संजय राऊत यांच्या समर्थनार्थ जोरदार शक्तीप्रदर्शन करत राजकीय वातावरण ढवळून काढले. महात्मा फुले चौक येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात शिवसैनिकांनी राऊत यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून पुष्पवृष्टी केली आणि घोषणाबाजी करत निष्ठेची गर्जना केली.

कार्यक्रमादरम्यान शहरप्रमुख महेश पुरोहित यांनी आक्रमक भूमिका घेत संजय राऊत यांच्यावरील आरोपांना राजकीय सूडबुद्धीचे षडयंत्र असल्याचा थेट आरोप केला.

शिवसेनेचा बुलंद आवाज दाबण्यासाठी काही भाडोत्री लोकांचा वापर करून राऊत यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण शिवसैनिक कोणत्याही दबावाला झुकणारे नाहीत असा इशाराच त्यांनी दिला.



राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये संजय राऊत सातत्याने सत्ताधाऱ्यांवर आक्रमक टीका करत असल्याने ते राजकीय निशाण्यावर असल्याची भावना शिवसैनिकांमध्ये स्पष्टपणे दिसून आली. या निमित्ताने ग्रामीण भागातही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची संघटनात्मक ताकद कायम असल्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

यावेळी शिवसेना जिंदाबाद संजय राऊत आगे बढ़ो

हम तुम्हारे साथ हैं अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या प्रचाराला बळी पडू नये असे आवाहनही पदाधिकाऱ्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले.

या कार्यक्रमास प्रदीप पैठणकर, रवि सुरसे, संतोष सुरडकर, बालू जाधव, अशोक साबले, कृष्णा तराल, योगेश पुंड, बबन शिंदे, आकाश सुरडकर, प्रल्हाद ओमकार, राजू शैलके, दत्तू सुरडकर, नदन कचके, संजय आक्से, संदीप लाड, अन्ना सुरडकर यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# आष्टी येथील श्री भास्कर अकॅडमीत पात्र शिक्षकांची भरती – प्रा.शिवाजी राख पाटील

स्पर्धा परीक्षा क्षेत्रात करिअरची सुवर्णसंधी

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) आष्टी शहरातील नामांकित स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन संस्था श्री भास्कर अकॅडमी, आष्टी यांच्या वतीने नव्याने सुरू होणाऱ्या बॅचेससाठी विविध विषयांच्या पात्र व अनुभवी शिक्षकांची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. स्पर्धा परीक्षा क्षेत्रात अध्यापनाची आवड असलेल्या शिक्षकांसाठी ही एक मोठी संधी मानली जात आहे. संस्थेचे प्रमुख प्रा. शिवाजी राख पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अकॅडमीचा विस्तार करण्यात येत असून त्यासाठी गणित, बुद्धिमत्ता, विज्ञान, सामान्य ज्ञान, मराठी व इंग्रजी या विषयांसाठी पात्र शिक्षकांची आवश्यकता आहे. संबंधित विषयांमध्ये उच्च शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे.




भरती प्रक्रियेत गणित व बुद्धिमत्ता तसेच विज्ञान व सामान्य ज्ञान विषयासाठी च.डल., इ.एव. पात्रता आवश्यक असून मराठी आणि इंग्रजी विषयासाठी च.-., इ.एव. पात्रता अपेक्षित आहे. अध्यापनाचा अनुभव असलेल्या तसेच स्पर्धा परीक्षा क्षेत्राची जाण असलेल्या उमेदवारांना विशेष प्राधान्य दिले जाणार असल्याचे संस्थेकडून स्पष्ट करण्यात आले आहे. श्री भास्कर अकॅडमीत अनुभवी मार्गदर्शकांसोबत काम करण्याची संधी, व्यावसायिक विकास व प्रशिक्षण, आकर्षक वेतन व प्रोत्साहन तसेच उत्तम कार्य वातावरण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे तरुण शिक्षकांमध्ये या भरतीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. १ जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या नवीन बॅचेससाठी ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून इच्छुक व पात्र उमेदवारांनी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. शिवाजी राख पाटील यांनी केले आहे.

श्री भास्कर अकॅडमी ही संस्था पंचायत समिती कार्यालयाच्या मागे, आष्टी येथे कार्यरत असून स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन क्षेत्रात अल्पावधीतच विद्यार्थ्यांचा विश्वास संपादन करण्यात संस्थेला यश आले आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांसाठी प्रभावी मार्गदर्शन ही संस्थेची ओळख बनली आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी प्रा. शिवाजी राख पाटील यांच्याशी ९८५०७७२१२९ किंवा ९८५०९८२१२९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# भरदिवसा सासू-सासऱ्याचा खून करणाऱ्या नराधम जावयाला जन्मठेप

### अंबड सत्र न्यायालयाचा धडाकेबाज निकाल दुहेरी हत्याकांडातील आरोपी थेट जेलमध्ये

तपासी अधिकारी एपीआय साजिद अहमद यांच्या तपासाला यश

अंबड विशेष प्रतिनिधी शेख फारुक :-

तू माझी बायको नांदायला का पाठवत नाही ? या क्षुल्लक कारणावरून भरदिवसा सासू-सासऱ्यावर गोळ्या झाडून त्यांचा निर्घृण खून करणाऱ्या नराधम जावयाला अखेर न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावत थेट जेलची हवा दाखवली आहे. अंबड येथील दुसरे जिल्हा व सत्र न्यायाधीश एम. जे. जे. बेग यांनी आरोपी किशोर शिवदास पवार वय ३८, रा.आडुळ ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर याला दुहेरी हत्याकांडात दोषी ठरवत जन्मठेप आणि १६ हजार रुपयांचा दंड ठोठावला. या निर्णयामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पीडित कुटुंबाला अखेर न्याय मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

भरदिवसा रक्तरंजित थरार

ही थरकाप उडवणारी घटना २९ मार्च २०२३ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास अंबड शहरातील शंकरनगर परिसरात घडली होती. मृत पंडित भानुदास काळे यांच्या घरी कुटुंबीय उपस्थित असताना आरोपी किशोर पवार हा आपल्या साथीदारांसह तिथे धडकला. घरात शिरताच माझी बायको नांदायला का पाठवत नाही ? असा जाब विचारत त्याने शिवीगाळ आणि दमदाटी सुरू केली.

यानंतर आरोपी आणि त्याच्या साथीदारांनी सासऱ्यावर लाथाबुक्क्यांनी हल्ला चढवला. मात्र एवढ्यावरच त्याचा संताप शांत झाला नाही. स्वतःजवळील पिस्तूल बाहेर काढत त्याने सासऱ्याच्या गळ्यावर आणि पाठीवर जवळून गोळ्या झाडल्या. या भीषण गोळीबारात सासऱ्याचा जागीच मृत्यू झाला तर सासूचाही जीव गेला. भरदिवसा झालेल्या या दुहेरी हत्याकांडाने अंबड शहर हादरून गेले होते.

पुरावे लपवण्याचाही कट

खून केल्यानंतर आरोपी किशोर पवार याने साथीदारांच्या मदतीने हत्येसाठी वापरलेले पिस्तूल पाचोड परिसरात लपवून ठेवले होते. मात्र अंबड पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत संपूर्ण कटाचा पर्दाफाश केला. आरोपींनी पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी पोलिसांनी तांत्रिक आणि शास्त्रीय तपासाच्या जोरावर गुन्ह्याची प्रत्येक कडी उघड केली.



एपीआय साजिद अहमद यांचा धारदार तपास

या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२, ४४९, ३२३, ५०४, ५०६, ३४, शस्त्र कायदा आणि ट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक साजिद अहमद यांनी अत्यंत बारकाईने तपास करत मजबूत दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले.

सरकारी पक्षाचा भक्कम युक्तिवाद

सरकार पक्षातर्फे जिल्हा सहायक सरकारी अभियोक्ता ड. वाल्मीक आ. घुगे यांनी न्यायालयात प्रभावी बाजू मांडली. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, घटनास्थळ पंचनामा जप्त हत्यार रक्तरंजित कपडे आणि मोटारसायकल यासह महत्त्वाच्या पुराव्यांची मजबूत साखळी न्यायालयासमोर उभी करण्यात आली. तब्बल दहा साक्षीदारांच्या साक्षींमुळे आरोपीविरुद्धचे आरोप अधिक भक्कम झाले.

अखेर नराधम जावयाची थेट जेलमध्ये रवानगी

सरकारी पक्षाचा धारदार युक्तिवाद आणि पोलिसांनी सादर केलेले ठोस पुरावे ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपी किशोर पवार याला जन्मठेप आणि १६ हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास आणखी एक वर्षाची साधी कैद भोगावी लागणार आहे.

या खटल्यात कोर्ट पैरवीसाठी पोलीस अंमलदार बळीराम खैरे, उप अवचार आणि मथाजी पांढरे यांनीही मोलाचे सहकार्य केले. भरदिवसा घडलेल्या या थरारक दुहेरी हत्याकांडात न्यायालयाने दिलेल्या कठोर निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत असून कायद्याचा धाक अजून जिवंत आहे अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# रुग्णसेवा ही बोलण्यात नव्हे तर कृतीत असावी लागते;आ.सुरेश धस यांचे जिवंत उदाहरण

### गरीब कुटुंबाला दिला मोठा आधार : सह्याद्री हॉस्पिटलचे साडेचार लाखांचे बिल माफ करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात मिळवून दिला

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) सर्वसामान्य जनतेच्या अडचणीच्या काळात धावून जाणारे नेतृत्व म्हणून ओळख असलेले आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी पुन्हा एकदा आपल्या संवेदनशील आणि लोकाभिमुख कार्याची प्रचिती दिली आहे. रुग्ण सेवा ही केवळ बोलण्यात नसून ती कृतीतून दिसली पाहिजे, याचे जिवंत उदाहरण नुकत्याच घडलेल्या एका घटनेतून समोर आले आहे.

आष्टी तालुक्यातील हातोला येथील रहिवासी स्व. एकनाथ दशरथ गर्जे यांना प्रकृती गंभीर झाल्याने पुणे येथील सह्याद्री हॉस्पिटल, येरवडा येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. गेल्या तीन दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उपचारानंतर हॉस्पिटलकडून तब्बल ४ लाख २७ हजार रुपयांचे बिल करण्यात आले होते. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने मृत व्यक्तीच्या नातेवाईकांसमोर मोठे संकट उभे राहिले. मयत एकनाथ गर्जे यांचे पुतणे विजय



गर्जे आणि विकास गर्जे हे त्यांच्यासोबत पुण्यात उपस्थित होते. हॉस्पिटल प्रशासनाने बिल भरल्याशिवाय मृतदेह ताब्यात दिला जाणार नाही, अशी भूमिका घेतल्याने नातेवाईक पूर्णपणे हतबल झाले होते. अशा वेळी त्यांनी पोपट गर्जे यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण हकीकत सांगितली. त्यानंतर तत्काळ आमदार सुरेश धस यांच्याशी संपर्क साधण्यात आला.

त्या वेळी आमदार धस हे मुंबई येथे कामानिमित्त असतानाही त्यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत तात्काळ सह्याद्री हॉस्पिटलच्या डॉक्टरांशी संपर्क साधला. मयत रुग्णाचे कुटुंब अत्यंत गरीब असून त्यांच्याकडे पैसे नाहीत, त्यांना सहकार्य करा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी हॉस्पिटल प्रशासनाला दिल्या. तसेच विजय गर्जे यांना एक रुपयाही भरू नका, असेही त्यांनी सांगितले. तरीदेखील हॉस्पिटल प्रशासनाकडून काही रक्कम भरण्याचा आग्रह धरण्यात येत होता. त्यानंतर पुन्हा आमदार धस यांना परिस्थिती सांगण्यात आली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता सह्याद्री हॉस्पिटलच्या असिस्टंट मॅनेजमेंटशी थेट संपर्क साधून रुग्णाच्या नातेवाईकांकडून कोणतीही रक्कम घेऊ नका, अशा कडक सूचना दिल्या. त्यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर रात्री साडेआठ ते नऊ वाजण्याच्या सुमारास मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

यानंतर ससून रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रिया पूर्ण करून रात्रीच पार्थिव हातोला गावात आणण्यात आले. दिनांक २० मे २०२६ रोजी सकाळी साडेसात वाजता गावात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या संपूर्ण प्रक्रियेत आमदार सुरेश धस यांच्यासोबत आरोग्य विभागाचे काम पाहणारे पीए विकास तात्या साळवे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. त्यांच्या तत्परतेमुळे गरीब कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला. या घटनेनंतर संपूर्ण परिसरात आमदार सुरेश धस यांच्या कार्याची चर्चा सुरू असून, सामान्यांच्या अडचणीच्या काळात धावून येणारे लोकनेते अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. गर्जे परिवारानेही धस आण्णांनी आम्हाला आभाळाएवढी मदत केली. अत्यंत कठीण प्रसंगी त्यांनी आधार दिला, अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त केली.



# शिवाय नमः शिवाय बाळु मामा नमः शिवाय!

## हजोराच्या संख्याने दावरवाडीत बाळूमामाचे मेंढ्याचे दर्शन व आरतीसाठी भाविकांची गर्दी...!

दावरवाडी प्रतिनिधी/

दावरवाडी येथे चार दीवसा पासुन बाळूमामाच्या दर्शनासाठी दावरवाडी परिसरातून हजरच्या संख्येने आरतीसाठी व मेंढ्याच्या दर्शनासाठी भाविकांची अफाट गर्दी दिसून येत आहे यावर्षी उन्हाचा पारा जास्त असल्याने दिल ते २००० मेंढ्या यांच्या खाण्यापिण्याची सोय नसल्याने त्या गावात जास्त मुक्काम होत नाही आणि शेवटच्या टप्प्यामध्ये सध्या बाळूमामाच्या पालखी पोहोचत असल्याने शेतकऱ्यांनी आपापली शेती नांगरणी करून ठेवलेली आहे त्यामुळे मेंढ्यांची चारण्याची सोय नसल्याने जास्त दिवस त्या गावांमध्ये थांबत नाही त्यांना मेंढ्याच्या सोयीसाठी दुसऱ्या गावात जावया लागते चार दिवसापासून दावरवाडी गावात आल्यापासून गावात भाविक भक्तांचे बाळूमामाच्या दर्शनासाठी दिवसभर गाड्या व संध्याकाळी आरती व मेंढ्यांच्या दर्शनासाठी खूप मोठी गर्दी होत आहे आरती झाल्यावर भोजनाची व्यवस्था गावकऱ्याकडून केली जाते भक्तांच्या श्रद्धेनुसार त्यांच्या मेंढ्या देखील पवित्र मानल्या जात ज्या शेतातून किंवा गावातून त्यांच्या मेंढ्याचा किंवा थांबत त्या ठिकाणी आनंद आरोग्य समृद्धी नांदते असे मानले जाते



# वाढत्या महागाईच्या निषेधार्थ बीडमध्ये राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अनोखे आंदोलन

आष्टी – (एस.राजेंद्र लाड) सध्या देशात आणि राज्यात वाढती महागाई आणि इंधनटंचाईमुळे सर्वसामान्य जनता होरपळून निघत आहे. मात्र,जनता त्रस्त आणि सरकार मस्त अशी विदारक परिस्थिती निर्माण झाली आहे.या सुस्त आणि निष्क्रिय सरकारच्या निषेधार्थ आज दि. २१ मे रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) वतीने प्रतीकात्मक झोप काढून अनोखे आणि लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देऊन शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. संपूर्ण जग जेव्हा तेल, गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंच्या नियोजनात व्यस्त होते, तेव्हा देशाचे पंतप्रधान व केंद्र सरकार सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे सोयीस्कररीत्या दुर्लक्ष करून केवळ निवडणुकांमध्ये मग्न होते. पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू आणि आसाम या राज्यांतील निवडणुका आणि प्रचारसभांमध्येच सरकार व्यस्त राहिले. देशाच्या व्यवस्थेला वाऱ्यावर सोडून केवळ सत्तेचा विचार करणाऱ्या या झोपलेल्या सरकारचा जाहीर निषेध करण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले, असा घणाघात आंदोलकांनी निवेदनातून केला आहे. सुस्त सरकारच्या निष्क्रियतेचा निषेध करण्यासाठी गुरुवारी दि. २१ मे रोजी सकाळी १० वाजता राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार) पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चक्क झोपून शासनाचा निषेध नोंदवला.शासनाने आता तरी झोपेतून जागे व्हावे आणि तात्काळ महागाई नियंत्रणात आणावी. तसेच, इंधनाचे व जीवनावश्यक वस्तूंचे योग्य नियोजन करून सर्वसामान्य जनतेला मोठा दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली आहे. जनतेच्या या तीव्र भावना शासनापर्यंत पोहोचवाव्यात, अशी विनंतीही जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

या आंदोलनात आणि निवेदन देताना राहुल काकडे, अविनाश सानप, दीपक हजारे, विनोद पवार, राम येवले, कुलदीप पवार

# चंदनझिऱ्यात मनपाचा ढिसाळ कारभार गटरची सफाई न झाल्याने गरीब कुटुंबाच्या कच्च्या घराला धोका

## तर होणाऱ्या जिवितहानीला मनपा प्रशासनच जबाबदार शेख समीर यांचा थेट आयुक्तांना धडाकेबाज इशारा

जालना शेख फारुक :-

जालना महानगरपालिकेच्या आरोग्य आणि स्वच्छता विभागाचा अत्यंत ढिसाळ आणि बेजबाबदार कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. चंदनझिरा परिसरातील मौलाना आझाद चौक येथील रहिवासी शेख समीर यांच्या कच्च्या घराला येथील तुंबलेल्या गटरमुळे प्रचंड मोठा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी आणि स्वच्छता निरीक्षकांच्या उंबरठ्या झिजवूनही न्याय न मिळाल्याने अखेर संतप्त झालेल्या शेख समीर यांनी थेट जालना मनपा आयुक्त महोदयांचे दार ठोठावले असून त्वरित कारवाई न झाल्यास होणाऱ्या दुर्घटनेला मनपा प्रशासन जबाबदार राहील असा थेट आणि धारदार इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

दुर्गंधीचे साम्राज्य आणि भिंतींना सुटला पजरा

मिळालेल्या माहितीनुसार शेख समीर यांच्या घराच्या पाठीमागे असलेली मुख्य नाली गटर गेल्या अनेक वर्षांपासून साफच करण्यात आलेली नाही. मनपाच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी या भागाकडे साफ पाठ फिरवली आहे. त्यामुळे या परिसरात रात्रंदिवस प्रचंड दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे गटरचे पाणी पुढे जाण्यास जागा नसल्याने ते तिथेच साचून राहिले आहे. या साचलेल्या पाण्याचा झिरपा पजरा शेख समीर यांच्या भेंडे च्या कच्च्या माती आणि खडीच्या भिंतींमध्ये उतरला आहे. यामुळे घराच्या भिंती कमकुवत झाल्या असून त्या कधीही कोसळण्याच्या स्थितीत आहेत. एका गरीब कुटुंबाच्या डोक्यावर २४ तास मृत्यूची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

नगरसेवक इन्स्पेक्टर ठरले ढिम्म

आपल्या कुटुंबाचा जीव धोक्यात असल्याचे पाहून शेख समीर यांनी स्थानिक नगरसेवक आणि मनपाचे सॅनिटरी इन्स्पेक्टर स्वच्छता निरीक्षक यांच्याकडे वारंवार चकरा मारल्या. त्यांना या गंभीर परिस्थितीची जाणीव करून दिली. परंतु, नेहमीप्रमाणे 'ढिम्म' प्रशासनाने याकडे साफ दुर्लक्ष केले. लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या या आंधळेपणाला कंटाळून अखेर शेख समीर यांनी थेट आयुक्तांकडे धाव घेतली.

निवेदनातील प्रमुख आणि धारदार मागण्या

चंदनझिरा परिसरातील मुख्य गटरची तात्काळ आणि पूर्ण सफाई करण्यात यावी.

साचलेल्या पाण्याचा प्रवाह मोकळा करून घराला होणारा पाण्याचा धोका त्वरित थांबवावा.

केवळ कागदावर स्वच्छता दाखवणाऱ्या संबंधित निष्काळजी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी.

तर गाठ माझ्याशी आहे

आम्ही गरिबांनी जगायचं कसं ? अनेक वर्षांपासून गटर साफ नाही. माझ्या कच्च्या घराच्या भिंतीत पाणी झिरपून घर कधीही पडू शकतं. घरात लहान मुलं आहेत उद्या काही अघटित घडलं आणि जीवितहानी झाली तर त्याचे पाप कोणाचे ? स्थानिक अधिकारी ऐकत नाहीत म्हणूनच आयुक्तांना निवेदन दिले आहे. त्वरित कारवाई झाली नाही तर होणाऱ्या गंभीर परिणामांना सर्वस्वी मनपा प्रशासनच जबाबदार असेल

शेख समीर पीडित रहिवासी चंदनझिरा

आता तरी आयुक्त जागे होणार का ?

एकीकडे जालना शहराला स्मार्ट आणि स्वच्छ बनवण्याचे दावे केले जात असताना दुसरीकडे चंदनझिऱ्यासारख्या भागात नागरिकांना मूलभूत हक्कांसाठी आणि स्वतःचा जीव वाचवण्यासाठी थेट आयुक्तांकडे याचना करावी लागत आहे ही मनपासाठी अत्यंत शरमेची बाब आहे. आता या निवेदनानंतर तरी आयुक्त महोदय झोपलेल्या प्रशासनाला जागे करून शेख समीर यांच्या कुटुंबाला न्याय देतात की एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहतात ? याकडे संपूर्ण चंदनझिरा वासियांचे लक्ष लागले आहे.फ



## जालना शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्यासोबत

## माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या समवेत भास्करराव अंबेकर यांची सदिच्छा भेट

## जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर चर्चा

जालना प्रतिनिधी :- शिवसेनेचे मुख्यनेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे यांची गुरुवारी दि.२१ मुंबई येथे शिवसेनेचे जालना जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी माजी मंत्री अर्जुन राव खोतकर हे प्रमुख उपस्थित होते.

या महत्त्वपूर्ण भेटीत जालना जिल्ह्यातील शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसह आगामी राजकीय घडामोडींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यात पक्ष अधिक बळकट करण्यासाठी विविध स्तरांवर पदाधिकाऱ्यांची बांधणी कार्यकर्त्यांचे संघटन आणि गावपातळीवरील पक्ष विस्ताराबाबत सकारात्मक खलबते झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना जिल्ह्यात शिवसेनेची ताकद वाढविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी अधिक जोमाने काम करण्याच्या सूचना दिल्याचे समजते. तसेच जिल्ह्यातील विकासकामे जनसंपर्क अभियान आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर संघटन अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला.

या भेटीप्रसंगी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. पंडितराव भुतेकर यांचीही उपस्थिती होती. या सदिच्छा भेटीमुळे जालना जिल्ह्यातील शिवसेना संघटनात्मक हालचालींना वेग येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## ट्रॅक्टरला डिझेल नाकारल्यास रानात उतरणार संताप

# शेतकरी गुन्हेगार नाही कॅनमध्ये डिझेल द्या

# अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेसचे तीव्र आंदोलन

मा.आ.चंद्रकांत दानवेंचा जिल्हाधिकाऱ्यांना थेट इशारा

भोकरदन इसरार खान पठाण :-

खरीप हंगाम तोंडावर आलेला असताना भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळवताना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नावर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आक्रमक झाला असून आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांनी थेट जिल्हाधिकारी जालना यांना पत्र पाठवत कॅनमध्ये डिझेल देण्यास तात्काळ परवानगी द्यावी अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा खरीप हंगाम खोळंबल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

दि.२१ मे २०२६ रोजी पाठवलेल्या पत्रात आमदार दानवे यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर जोरदार टीका करत म्हटले की इंधन तुटवड्याच्या काळात शासनाने पेट्रोल-डिझेल कॅनमध्ये देण्यावर निर्बंध घातले होते. मात्र आज



परिस्थिती पूर्णपणे बदलली असून त्या निर्णयाचा सर्वाधिक फटका कष्टकरी शेतकऱ्यांना बसत आहे. देशाची अन्नसुरक्षा सांभाळणारा शेतकरी स्वतःच्या ट्रॅक्टरसाठी डिझेल मिळवण्यासाठी हेलपाटे मारत असेल, तर ही प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

१५ ते २० किमीवर पंप शेतातच बंद पडतात ट्रॅक्टर

खरीप हंगामासाठी नांगरणी वखरणी आणि पेरणीची लगबग सुरू असताना ग्रामीण भागातील अनेक शेतांपासून पेट्रोल पंप तब्बल १५ ते २० किलोमीटर अंतरावर आहेत. खराब रस्ते, दुर्गम शिवार आणि ट्रॅक्टरच्या छोट्या टाक्यांमुळे वारंवार पंपावर जाणे अशक्य होत आहे. परिणामी अनेक ट्रॅक्टर शेतातच बंद पडत असून शेतीची कामे ठप्प होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली आहे.

शेतकरी गुन्हेगार नाही दानवेंचा संतप्त सवाल

एकीकडे शासन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या घोषणा करते आणि दुसरीकडे त्यालाच डिझेलसाठी रांगेत उभे करून अपमानित केले जाते. शेतीसारख्या अत्यावश्यक कामासाठी जर इंधन मिळत नसेल, तर शेतकऱ्याने शेती करायची कशी ? असा संतप्त सवाल आमदार दानवे यांनी उपस्थित केला.

शेतकरी हा कोणताही गुन्हेगार नाही की त्याच्यावर संशय घेऊन डिझेल नाकारले जाईल. काही अपवादात्मक घटनांमुळे संपूर्ण शेतकरी वर्गाला वेठीस धरणे अन्यायकारक आहे अशा शब्दांत त्यांनी प्रशासनाला खडे बोल सुनावले.

कागदपत्र तपासा पण डिझेल द्या

शेतकऱ्यांचे आधारकार्ड ७/१२ उतारा, ट्रॅक्टरची कागदपत्रे किंवा कृषी वापराची खात्री करून शेती मशागतीसाठी कॅनमध्ये डिझेल देण्यास तात्काळ परवानगी द्यावी अशी मागणी आमदार दानवे यांनी केली आहे. अन्यथा खरीप हंगामातील शेतीकामे ठप्प झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील असा थेट इशाराही त्यांनी दिला.

आंदोलनाचा इशारा

प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास शेतकरी रस्त्यावर उतरतील आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा निर्वाणीचा इशारा आमदार दानवे यांनी पत्राच्या शेवटी दिला आहे.

हे पत्र जिल्हाधिकारी जालना तसेच उपविभागीय अधिकारी भोकरदन यांना पाठवण्यात आले आहे.

# ईनाम जमिनी बेनाम करुन कथित बोगस लेआऊट प्रकरणी

# अंबाजोगाई तहसीलदार तरंगेंवरती गुन्हा दाखल करण्याची मागणी

## अन्यायग्रस्त कर्हाडे कुटुंबियांचा आमरण उपोषणाचा इशारा

अंबाजोगाई / सुनिल सिरसाट

येथील ईनाम प्रतिबंधित मालकीच्या जमिनीच्या प्रकरणात कथितरित्या नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर फेरफार आणि बोगस रेखाकन आदेश दिल्याचा आरोप करत तहसीलदार विलास तरंगे यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करावे. या मागणीसाठी तक्रारदार मिलिंद म. कर्हाडे यांनी सहकुटुंब आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. मौजे अंबाजोगाई येथील १५ एकर १ गुंठा जमिनीच्या गैरव्यवहारप्रकरणी तहसीलदार तरंगे यांनी मोठा आर्थिक व्यवहार करत भ्रष्टाचारातून आपल्या पदाचा-अधिकारांचा गैरवापर केल्याचा थेट आरोप मिलींद कर्हाडे यांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केला आहे.

तहसीलदार तरंगे तुम्ही स्वतःला जरांगे समजायले की काय....?

उपलब्ध माहितीनुसार अंबाजोगाई येथील सर्व्हे नं. ३८१/१ मधील १५ एकर ०१ गुंठा ही ईनाम प्रतिबंधित मालकीची जमीन वाटणी व हस्तांतर अयोग्य या शर्तीवर अर्जदाराचे आजोबा पंडिताचार्य





बाळाचार्य कर्हाडे यांना सरकारकडून मिळाली होती. नियमानुसार या जमिनीचा उपभोग केवळ मूळ मालक किंवा त्यांचे वारसदारच घेऊ शकतात. तसेच बीड जिल्हाधिकार्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय या जमिनीच्या ७/१२ अभिलेखात कोणताही फेरबदल करता येत नाही. असे असतानाही तहसीलदार विलास तरंगे यांनी या नियमांचे जाणीवपूर्वक उल्लंघन करून मूळ मालकाव्यतिरिक्त इतर व्यक्तींच्या नावांच्या नोंदीला बेकायदेशीरपणे मान्यता दिली. यावरून आंबाजोगाई शहरात जवळजवळ एकच कुजबूज सुरू आहे की, सरकारला, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह दोन-तीन मंत्री, माजी मंत्री यांना प्रसारमाध्यमाच्या माध्यमातून जरांगे जशी आपली मनमानी करत बोलतात. अगदी तशीच काहीशी मनमानी अंबाजोगाई तहसीलचा कार्यभार घेतल्यापासून विलास तरंगे यांनी लावल्याचा या प्रकरणातील मिलिंद कराडे यांच्यासह चंद्रपूरच्या सामाजिक कार्यकर्त्या प्रिया झांबरे, ड.सतीश केंद्रे, असोओद्दीन खतीब बाबा यांच्यासह इतरही अनेकांनी वेळोवेळी आपली भावना व्यक्त करताना विलास तरंगे स्वतःला तुम्ही जरांगे समजत आहात का....? अशी विचारणा केली आहे.

तरंगे यांचा प्रताप एवढ्यावरच थांबला नाहीतर याशिवाय सदर जमिनीच्या रेखांकन मंजुरी प्रस्तावाचे (लेआउट) अधिकार अंबाजोगाईच्या उपविभागीय अधिकार्यांकडे असताना, तहसीलदार तरंगे यांनी या अधिकारांचा बेकायदेशीर वापर करून बोगस रेखांकन आदेश तयार केल्याचा गंभीर आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. या बोगस आदेशामुळे सर्वसामान्य जनतेची फसवणूक होण्याची भीती निर्माण झाली असून, हा प्रकार पूर्णपणे गुन्हेगारी स्वरूपाचा आहे. बीड जिल्ह्यात नुकताच गैरव्यवहारात जिल्ह्याचे माजी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यावरती गुन्हा दाखल होऊन ते आज तुरुंगात आहेत. तर मग विलास तरंगे तर केवळ एक तहसीलदार आहेत. मग तरंगे काय सरकारचे जावई आहेत काय....? तेंव्हा तहसीलदार विलास तरंगे यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावरही जिल्हाधिकारी यांच्याप्रमाणे तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा, अन्यथा संपुर्ण क-हाडे कुटुंबीयास आमरण उपोषणाला बसावे लागेल, असा इशारा मिलिंद कर्हाडे यांनी दिला आहे. या प्रकरणामुळे महसूल अंबाजोगाईसह संपूर्ण बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. तेंव्हा आता जिल्हा-विभाग प्रशासनासह सरकार स्तरावर तहसीलदार विलास तरंगे यांच्यावरती नेमकी काय कारवाई होणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.....!

# शिक्षकही माणूस आहे,पण राष्ट्रकार्यासाठी सदैव तत्पर

## शिक्षकांच्या कर्तव्यनिष्ठेला सलाम




आष्टी - (एस.राजेंद्र लाड) देशाच्या भविष्यास आकार देणारा शिक्षक हा केवळ वर्गात धडा शिकवणारा कर्मचारी नसून समाजव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. शिक्षणासोबतच शासनाच्या विविध जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत असताना शिक्षक अनेक अडचणींना सामोरे जात असतो. उन्हाळ्यातील तब्बल ४३ अंश सेल्सिअस तापमान, अपुरा वेळ, वाढलेल्या प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि समाजातील टीका सहन करतही शिक्षक राष्ट्रकार्यासाठी अहोरात्र झटत असल्याचे वास्तव सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होत असलेल्या एका प्रभावी पोस्टरमधून समोर आले आहे.

शिक्षकही माणूस आहे...पण राष्ट्रकार्यासाठी सदैव तत्पर या आशयाच्या पोस्टरमधून शिक्षकांच्या दैनंदिन संघर्षाचे अत्यंत भावनिक आणि वास्तववादी चित्रण करण्यात आले आहे. या पोस्टरमध्ये शिक्षकांच्या विविध जबाबदाऱ्यांचा उल्लेख करण्यात आला असून, शिक्षणासोबतच जनगणना, डखठ काम, इङज सर्वेक्षण, परीक्षा कार्य, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आणि शासकीय नोंदी यांसारखी अनेक कामे शिक्षकांना पार पाडावी लागत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पोस्टरमध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षक घराघरात जाऊन जनगणनेची माहिती संकलित करतात, मतदार याद्यांसाठी इङज म्हणून सर्वेक्षण करतात, डखठ अंतर्गत माहितीची पडताळणी करतात, परीक्षा नियोजन व मूल्यमापन करतात आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहतात.

ग्रामीण भागात अपुरी साधने, उन्हाचा तीव्र तडाखा आणि वेळेची कमतरता असतानाही शिक्षक आपल्या जबाबदाऱ्या निष्ठेने पूर्ण करत असल्याचे चित्र यातून अधोरेखित करण्यात आले आहे. समाजात अनेकदा शिक्षकांना भरपूर सुट्ट्या असतात, पगार जास्त असतो, काम कमी असते अशा टीका होत असतात. मात्र प्रत्यक्षात शिक्षकांना शैक्षणिक कामांबरोबरच अनेक प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ न देता शासनाच्या विविध मोहिमा आणि उपक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सातत्याने कार्यरत असतात. पोस्टरमध्ये दाखविण्यात आलेला शिक्षक हातात विविध शासकीय कागदपत्रे घेऊन गावोगावी फिरताना दिसत आहे. त्याच्या चेहऱ्यावरचा थकवा आणि तरीही कर्तव्य पूर्ण करण्याची जिद्द शिक्षकांच्या वास्तव जीवनाचे प्रतीक ठरत आहे.

प्रचंड उष्णता, अपुरा वेळ, वाढलेल्या जबाबदाऱ्या तरीही न थांबता काम करण्याचे कारण मला माहित आहे; हाच देशाचा विकास आणि विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य! हा संदेश शिक्षकांच्या राष्ट्रनिर्मितीतील भूमिकेला अधोरेखित करणारा ठरत आहे. शिक्षक हा केवळ ज्ञानदाता नसून समाज परिवर्तनाचा वाहक आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात यश मिळवत आहेत. त्यामुळे शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणे आणि त्यांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहणे ही काळाची गरज असल्याची भावना सुजाण नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, समाजमाध्यमांवर या पोस्टरचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून खरा कर्मयोगी शिक्षक म्हणून शिक्षकांच्या समर्पणाला अनेकांनी सलाम केला आहे.

# शेर-ए-पंजाब मौलाना उस्मान लुधियानवी यांचा चिखलीत ऐक्याचा संदेश

## आई-वडिलांची सेवा करा,गरिबांना मदत करा,नावासाठी नव्हे तर कामातून ओळख निर्माण करा-शेर-ए-पंजाब मौलाना उस्मान लुधियानवी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आई-वडिलांची सेवा करा, समाजसेवा किंवा प्रतिनिधित्व करायचे असेल तर गरिबांना प्रथम प्राधान्य द्या. नावासाठी नव्हे तर आपल्या कामातून ओळख निर्माण व्हावी अशीच मदत करा. कुराण हा ग्रंथ सर्वांसाठी आहे. सर्व जाती-धर्माच्या लोकांनी तो एकदा अवश्य वाचावा. जाती-धर्माच्या भिंती पाडून टाका, आप आपसातील भांडणं थांबवा, स्वतःला हिम्मतवान समजत असाल तर गोर गरिबांना त्रास देऊ नका असे प्रतिपादन पंजाब राज्याचे शाही इमाम मौलाना उस्मानसाहेब लुधियानवी यांनी मंगळवार दि. १९ रोजी आष्टी तालुक्यातील चिखली येथे आयोजित कार्यक्रमात केले. मौलाना उस्मानसाहेब लुधियानवी यांचे आष्टीत आगमन होताच सर्व धर्मियांच्या वतीने त्यांचे ठीक ठिकाणी स्वागत करून त्यांच्यावर जेसीबीद्वारे फुलांची उधळण



करण्यात आली.

आष्टी तालुक्यातील चिखली येथे मायनॉरिटी सोशल डेव्हलपमेंट बोर्डांतर्गत कार्यरत असलेल्या जामीया अबुल हसन संस्थेद्वारा २०२२ पासून शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सुरू आहे. येथे विद्यार्थ्यांना उर्दू, अरबी शिक्षण, संगणक शास्त्र तसेच शालेय शिक्षण दिले जाते. तसेच नैतिक मूल्ये, संस्कार व देशभक्तीची भावना रुजविण्याचे कार्य सातत्याने करण्यात येते, त्यांच्या संस्थेची माहिती घेऊन पाहणी करून समाधान व्यक्त केले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मौलाना लुधियानवी यांनी अतिशय महत्त्वाचे संदेश दिले. या कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश देण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे चोख नियोजन करण्यात आले होते. यावेळी मुफ्ती शफिक साहेब मिल्ली, माजी आमदार साहेबराव दरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, देविदास धस, गणेश शिंदे, जि. प. सदस्य सतीश शिंदे, सभापती रमजान तांबोळी, काकासाहेब शिंदे, पत्रकार बबलू सय्यद, अण्णासाहेब साबळे, प्रा. निसार शेख, कासम शेख, मुजाहिद सय्यद, जावेद पठाण, शिवरायाचा मावळा समीर शेख तसेच परिसरातील नागरिक व सर्व धर्मीय बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोदावरी नदी पात्रात अंबड प्रशासनाचा सर्जिकल स्ट्राईक
# साष्ट पिंपळगाव अन् गांधारी घाटावर ईटीएस मोजणी पूर्ण

अंबड प्रतिनिधी :-

गोदावरी नदीपात्रातील अवैध वाळू उपशाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अंबड महसूल प्रशासनाने बुधवारी अक्षरश सर्जिकल स्ट्राईक करत वाळू माफियांच्या साम्राज्यावर धडक कारवाई केली. उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी आणि तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ५० ते ६० अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या ताफ्याने साष्टपिंपळगाव, गांधारी घाट, डोमलगाव आणि माळसपिंपळगाव परिसरात गोपनीय मोहीम राबवत बेकायदेशीर वाळू उपशाचे ईटीएस द्वारे तांत्रिक मोजमाप पूर्ण केले.

विशेष म्हणजे कारवाई सुरू असतानाच काही मुजोर वाळू माफियांनी अधिकाऱ्यांसमोरच राजरोसपणे लोडरच्या सहाय्याने हायवा ट्रकमध्ये वाळू भरणे सुरू ठेवले. या संपूर्ण प्रकाराचे प्रशासनाने व्हिडिओ आणि छायाचित्र पुरावे गोळा करून संबंधितांवर कठोर फौजदारी कारवाईची प्रक्रिया सुरू केली आहे.

ऑपरेशन गोपनीय एपीएमसीतून सुरू झाली मोहीम

वाळू माफियांना कारवाईची कुठलीही भनक लागू नये म्हणून सर्व अधिकारी आणि कर्मचारी अंबड येथील एपीएमसी आवारात गुप्तपणे जमा झाले. त्यानंतर खाजगी वाहनांतून वेगवेगळ्या मार्गांनी साष्टपिंपळगाव घाट क्रमांक १ आणि २ परिसराला चारही बाजूंनी वेढा घालण्यात आला. अचानक प्रशासनाचे पथक धडकताच तस्करांची एकच धावपळ उडाली.

भूमी अभिलेख विभागाच्या तीन स्वतंत्र पथकांनी अत्याधुनिक ईटीएस तंत्रज्ञानाद्वारे नदीपात्रातील अवैध खड्ड्यांची अचूक मोजणी केली. या कारवाईत बीड जिल्ह्यातील गेवराई प्रशासनालाही सहभागी करून घेण्यात आले होते.

बीडच्या हद्दीतून अंबडमध्ये घुसखोरी बेकायदेशीर रस्त्याने वाळूची लूट

कारवाईदरम्यान धक्कादायक प्रकार उघडकीस आला. गेवराई तालुक्यातील सावरगाव येथील टेंडरधारकाने जालना जिल्ह्याची सीमा ओलांडून थेट अंबड तालुक्यातील गांधारी घाट परिसरात घुसखोरी केल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. एवढेच नव्हे तर बीडच्या बाजूने नदीपात्रात थेट बेकायदेशीर रस्ता तयार करून मोठ्या प्रमाणावर वाळूची वाहतूक सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

या गंभीर प्रकाराची नोंद घेऊन अंबड प्रशासनाने गेवराई तहसीलदारांसमोर संपूर्ण प्रकार उघड करत संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली.




तसेच साष्टपिंपळगाव घाट क्रमांक २ येथील रेती कंत्राटदाराने राक्षसभुवन परिसरातून विनापरवानगी रस्ता तयार करून रेती चोरी केल्याचेही उघड झाले.

अधिकाऱ्यांसमोरच मुजोरी व्हिडिओ पुरावे रवाना

डोमलगाव घाट क्रमांक १ आणि माळसपिंपळगाव परिसरात पाहणी सुरू असताना नदीत पाणी असल्यामुळे अधिकारी पलीकडे येऊ शकणार नाहीत, असा गैरसमज करून काही तस्करांनी अधिकाऱ्यांसमोरच वाळू उपसा सुरू ठेवला.

लोडरच्या सहाय्याने हायवा ट्रकमध्ये वाळू भरतानाचे व्हिडिओ प्रशासनाने टिपले असून हे सर्व पुरावे बीड आणि गेवराईच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले आहेत. संबंधितांविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

अधिकाऱ्यांना धमक्या आता मोक्का चा इशारा

गेल्या काही दिवसांत अवैध दोरखंड तोडून गुन्हे दाखल झाल्यामुळे वाळू माफिया संतप्त झाले आहेत. आजच्या कारवाईनंतर मुख्य सूत्रधार सुनील बालूर आणि त्याच्या टोळीने फिर्यादी मंडळ अधिकारी बामनावत यांना थेट फोनवरून धमक्या दिल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

यामुळे प्रशासन अधिक आक्रमक झाले असून संघटित वाळू माफियांवर मोक्का किंवा एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यासाठी पुन्हा बीड प्रशासनाला प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

नोटिसा बजावल्या कोट्यवधींच्या दंडाची तयारी

साष्टपिंपळगाव येथील दोन्ही घाटधारकांना यापूर्वीच कारण दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. भूमी अभिलेख विभागाचा अंतिम तांत्रिक अहवाल प्राप्त होताच संबंधितांवर कोट्यवधी रुपयांचा दंड ठोठावण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या मोहिमेत भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक अशोक कोन्ते, मिटकरी, मुंडे, नायब तहसीलदार एकनाथ भोजने, मंडळ अधिकारी कल्याण माने, कृष्णा येडके, तलाठी सुनील उंबरहंडे, लोणीकर, लव्हाळे, गणेश खरात, राजू वैद्य तसेच कोतवाल आणि स्थानिक पोलीस पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

वाळू माफियांना आता पळता भुई थोडी- विजय चव्हाण

शासनाचा महसूल बुडवून पर्यावरणाची हानी करणाऱ्या वाळू तस्करांच्या पाठीशी उभे राहणाऱ्यांचाही बंदोबस्त केला जाईल. बीड-जालना सीमांवर आता २४ तास नजर ठेवली जाणार असून कठोर दंडात्मक कारवाई सुरू राहील असा इशारा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला.

---

## जनगणनेचे काम तालुक्यात सर्वात आधी पूर्ण करणारे
# शिक्षक मलिक चव्हाण यांचा जनगणना पथक दिल्लीच्या हस्ते गौरव

किनवट प्रतिनिधी दि.२१ : भारत सरकारच्या डिजिटल जनगणना अभियानांतर्गत किनवट शहरात जनगणनेचे कार्य वेगाने सुरू असून नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा जनगणना चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.शहरात सध्या एकूण ०६ पर्यवेक्षक आणि ४३ प्रगणक कार्यरत असून,अत्यंत कडक उन्हातही कर्मचारी प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत.

मे महिन्यातील तब्बल ४४ ते ४५ अंश सेल्सिअस तापमानातही जनगणना कर्मचाऱ्यांनी कामाची गती कायम ठेवली आहे.या पार्श्वभूमीवर किनवट शहरातील सर्कल क्र.०१, व्हड – ०६ अंतर्गत कार्यरत प्रगणक अब्दुल मलिक अब्दुल शब्बीर चव्हाण यांनी उल्लेखनीय कामगिरी करत किनवट तालुक्यात सर्वप्रथम जनगणनेचे कार्य पूर्ण करण्याचा मान मिळविला आहे.

प्रगणक मलिक चव्हाण यांनी चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे तसेच सर्कल पर्यवेक्षक मल्लिका अर्जुन स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली अल्पावधीत १३२ इमारतींमधील १५८ घरांची डिजिटल जनगणना पूर्ण केली.कमी वेळेत अचूक व शिस्तबद्ध पद्धतीने काम पूर्ण केल्यामुळे त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत चार्ज अधिकारी मुंगाजी काकडे व पर्यवेक्षक स्वामी यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाला याबाबत माहिती दिली आहे.तसेच आज दिनांक २१ मई रोजी भारत सरकार जनगणना कार्यालयचे पथक किनवट दौऱ्यावर आले असता डिजिटल जनगणना चे जॉईंट डायरेक्टर शर्मा सर,असिस्टंट डायरेक्टर बी.प्रसाद व पांडे सर,डिस्ट्रिक्ट कॉओरडीनेटर नेहाल , लतीफ पठाण यांच्या हस्ते अब्दुल मलिक शब्बीर चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

डिजिटल पद्धतीने जनगणना कार्य यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी किनवट शहरातील प्रगणक आणि पर्यवेक्षक अहोरात्र मेहनत घेत असून,नागरिकांनीही जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.मलिक शब्बीर चव्हाण यांच्या कार्यामुळे इतर प्रगणकांनाही प्रेरणा मिळत असल्याची भावना दिल्ली पथकातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे तसेच दिल्ली येथे जनगणना कार्यालयात उत्कृष्ट प्रगणक म्हणून मलिक चव्हाण यांचा सत्कार करण्यासाठी शिफारस करणार असल्याचे जनगणना पथकाने सांगितले.यावेळी नगरपालिका चे कार्यालयीन अधीक्षक भालेराव,सरोदे,खोबराडे,शेख अतिक,एजाज खान उपस्थित होते.

---

# जालना शहरात प्रज्ञा 'योगा'ची अनोखी जादू

## डोळ्यांना पट्टी बांधून मुलांनी ओळखले रंग, केले वाचन पालक थक्क

जालना शेख फारुक :-

दि. आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ११ दिवसीय इंट्युशन प्रोसेस प्रज्ञा योगा शिबिराचा उत्साहपूर्ण वातावरणात शानदार समारोप झाला. उन्हाळी सुट्टीत मुलांच्या सुप्त क्षमता जागृत करून त्यांचा सर्वांगीण विकास घडविणाऱ्या या अभिनव शिबिराने जालना शहरात विशेष आकर्षण निर्माण केले.



शिबिरातील अंतिम सादरीकरणावेळी विद्यार्थ्यांनी डोळ्यांना पट्टी बांधून रंग ओळखणे पुस्तकांचे वाचन करणे तसेच विविध कृती अचूकपणे करून दाखवल्याने उपस्थित पालक अक्षरश आश्चर्यचकित झाले. मुलांमधील एकाग्रता, आत्मविश्वास आणि मानसिक क्षमतांचा अनोखा आविष्कार पाहून सभागृहात उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

या ११ दिवसीय शिबिरात मुलांच्या स्मरणशक्ती वाढीसाठी, सर्जनशील विचारक्षमतेसाठी योग्य निर्णयक्षमता विकसित करण्यासाठी तसेच तणावमुक्त आणि सकारात्मक जीवनशैलीसाठी विविध उपक्रम योगसाधना आणि विशेष प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

शिबिराला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून जालना,बीड, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, अहिल्यानगर आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वरिष्ठ प्रशिक्षक श्री देव गोसकी आणि श्री माऊली दोबोले यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी मार्गदर्शन केले.

आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक भानुदासजी दोबोले यांच्या विशेष सहकार्याने देवगिरी नागरी सहकारी पतसंस्था सभागृह टाऊन हॉल कचेरी रोड जुना जालना येथे हे शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

समारोप कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोमीनाथ खाडे, बी. पी. उगले शाळेचे मुख्याध्यापक केशव फिस्के, ज्ञानेश्वर पवार, शिवाजी बामणे, योगेश हेंद्रे, बद्रीनाथ अरसूल, ड. शत्रुघ्न बनकर, ऋतुराज उदावंत, ड. मनीष राऊत, भीमराव खांडेभराड, नागेश मरकड, अमर शिंदे, सुरेश मरकड, विकास घुंगासे, बबनराव पंचलोटे आदी मान्यवर व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान पुढील प्रज्ञा योगा शिबिर लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली असून इच्छुक पालकांनी अधिक माहितीसाठी ९६६५७८९८६९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सुखकर भविष्यासाठी
# जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम

### सेवानिवृत्तीनंतरचे जीवन सक्षम व आनंदी व्हावे- मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली

नांदेड जिल्हा प्रतिनिधी सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या सेवाकाळात शासनामार्फत समाजासाठी महत्त्वपूर्ण कामे केलेली असून, त्यांची सेवा ही शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरलेली आहे. सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांचे आर्थिक, सामाजिक तसेच आरोग्यदृष्ट्या जीवन अधिक सक्षम व सुखकर व्हावे, यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने दोन दिवसीय मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले. जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, एसबीआयचे मुख्य व्यवस्थापक चव्हाण, व्यवस्थापक राऊत, पशुसंवर्धन विभागाचे सहआयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नियोजन विभागाचे शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे त्या म्हणाल्या, एखाद्या कर्मचाऱ्याला सेवानिवृत्ती स्वीकारणे हे सहज सोपे नसते. अनेक वर्षे नियमित कार्यालयीन कामकाज, सेवा व जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर निवृत्तीनंतर अचानक जीवनशैलीत बदल होतो. अशा वेळी आता पुढे काय हा प्रश्न अनेकांना पडतो. मात्र, सेवानिवृत्ती हा प्रत्येक सेवकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून, त्यानंतरचे जीवनही सकारात्मक, निरोगी आणि आनंदी पद्धतीने जगता आले पाहिजे. अनेकदा निवृत्तीनंतर मानसिक आणि शारीरिक बदल जाणवतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे निवृत्तीनंतरचे जीवन अधिक सुखकर व्हावे, ही जिल्हा परिषदेची जबाबदारी समजून या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सांगितले.




कार्यक्रमाची सुरुवात राज्यगीताने करण्यात आली. त्यानंतर दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त उपस्थितांनी शपथ घेतली. तसेच कार्यक्रमाच्या नियोजनासंदर्भातील माहितीपटही यावेळी दाखविण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी सेवानिवृत्तीनंतर कर्मचाऱ्यांनी आपल्या आवडी जोपासाव्यात असे सांगत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपलेखा व वित्त अधिकारी विशाल हिवरे यांनी केले तर सूत्रसंचालन मिलिंद व्यवहारे यांनी केले. या प्रशिक्षण शिबिराला सेवानिवृत्त होणारे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# खतांसाठी बळीराजाचा एल्गार !

## रासायनिक खतांचा तुटवडा दूर करा; अन्यथा देगलूर बंद – शिवसेना (ठाकरे)चा इशारा

देगलूर प्रतिनिधी

खरीप हंगाम तोंडावर आलेला असताना डीएपी, युरिया आदी रासायनिक खतांचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशारा देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सोमवार दि. २५ मे रोजी देगलूर येथील कृषी सेवा केंद्रे तसेच मोंढा बाजारातील आडत दुकाने बंद आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

खरीप हंगामासाठी सोयाबीन, मुग, उडीद, कापूस आदी पिकांच्या पेरण्या जवळ आल्या असून शेतकऱ्यांना डीएपी, युरिया यांसारख्या खतांची अत्यंत आवश्यकता आहे. मात्र तालुक्यात खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना तेलंगणा, आंध्रप्रदेश व कर्नाटक राज्यांमध्ये जाऊन जादा दराने खते खरेदी करावी लागत असल्याचा आरोप शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.




प्रचंड उन्हात शेतीची कामे बाजूला ठेवून खतांसाठी भटकंती करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना मानसिक, आर्थिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करू अशी घोषणा करणाऱ्या शासनाच्या काळात अन्नदाता बळीराजाला साधी खतेही उपलब्ध होत नसल्याची खंत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी, पोलिस निरीक्षक, आडत व्यापारी संघटना तसेच कृषी सेवा केंद्र संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने हे निवेदन सादर करून त्वरित खतांचा मुबलक पुरवठा करण्याची मागणी केली.

यावेळी माजी उपजिल्हाप्रमुख तथा माजी जिल्हा परिषद सदस्य नागनाथ वाडेकर, शिवसेना शहरप्रमुख भगवान जाधव, बाबुराव मिनकीकर, युवासेना तालुकाप्रमुख तथा सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, विनोद सोनकांबळे, संतोष कांबळे, सय्यद मिरभाई, गंगाधर पाटील चाकूरकर, राजू उल्लेवार, हणमंत राजुरे लख्खेकर, संजय पाटील लख्खेकर, दत्तात्रय बेंजलवार, शिवाजी चव्हाण, शिवाजी पाटील ढोसणीकर, गंगाधर वकंलवार, अर्जुन लुटे, राजू जाधव तडखेलतांडा, अजित पाटील पाळेकर, संजीव मंगरुळे, सिद्धेश्वर आयनेलवार, सायबू विभुते यांच्यासह शिवसैनिक, कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, सोमवारच्या बंद आंदोलनाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून खतांच्या प्रश्नावर आता शेतकरी अधिक आक्रमक होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

---




# लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्यपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे श्याम पाटील , व शंकर वट्टमवार यांची निवड

लोहा /प्रतिनिधी

लोहा नगर परिषदेच्या दोन स्वीकृत सदस्यांची पीठासीन अधिकारी नगराध्यक्ष शरद पवार व सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी संदीप भोळे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे श्याम पाटील पवार व माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार याचे पुतणे शंकर वट्टमवार यांची बिनविरोध निवड झाली.पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी या निवडणुकीत आ चिखलीकर यांनी दिलेला शब्द पाळला तसेच कार्यकर्त्यांना न्याय मिळाला . नगराध्यक्ष व सर्व नगरसेवक यांनी सहकार्य मिळाले असे सांगितले

लोहा नगर परिषदेच्या स्वीकृत सदस्य निवडीसाठी २१ मे गुरुवारी सकाळी अकरा वाजता पीठासीन अधिकारी म्हणून नगराध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली नगरसेवकाची विशेष बैठक पार पडली .सहाय्यक म्हणून मुख्याधिकारी संदिप भोळे, होते निवडीसाठी नगररचना अभियंता कृष्णा कठारे , अजिंक्य केंद्रे, सुतार, यांनी सहकार्य केले

खरेदी विक्री संघाचे माजी उपसभापती श्याम पाटील पवार व माजी नगराध्यक्ष किरण वट्टमवार याचे पुतणे

शंकर वट्टमवार यांची निवड करण्यात आली.सभागृहात आर्य वैश्य समाजाला प्रतिनिधित्व देऊ असा शब्द निवडणूक काळात आ प्रताप पाटील यांनी या समाजाच्या बैठकीत दिला होता त्याची पूर्तता करण्यात आली .तर नगराध्यक्ष शरद पवार यांचे धाकटे काका श्याम पाटील यांनीही प्रभाग नऊ मध्ये निवडणूक काळात उमेदवारी मागे घेताना शब्द दिला होता तो पाळण्यात आला असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर यांनी सांगितले.